असा. क्र. २८ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५


# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, मे १९, २००५/वैशाख २९, शके १९२७

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक** २३.---सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन आणि तत्संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.... | ३४२-३७८ |


दिनांक १७ मे २००५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १९ मे २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन आणि तत्संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राष्ट्रीय जल धोरण (२००२), यामध्ये सिंचन व्यवस्थापनातील विभिन्न बाबींमध्ये शेतकऱ्यांना अधिकाधिक सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत असे नमूद केले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र जल व सिंचन आयोग (१९९९) याने पाणी वापर संस्थेला, घनमापन तत्त्वावर सार्वजनिक कालवा व्यवस्थेमधील पाण्याचा पुरवठा करून सिंचन व्यवस्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांच्या सहभागाने सांविधिक तरतुदी करण्यात याव्यात अशी शिफारस केली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य शासनाची निर्मित सिंचनक्षमता आणि तिचा प्रत्यक्ष वापर यामधील तफावत भरून काढण्याची आणि सिंचन व्यवस्थेचे वाटप, वितरण, वापर आणि निस्सारण यांचा वाढीव कार्यक्षमतेने वापर करून त्याद्वारे भूपृष्ठावरील व भूगर्भातील पाण्याचा यथोचित वापर करून जास्तीत जास्त फायदा मिळविण्याची आणि शेतकऱ्यांना, एकत्रितपणे काम करून शेतीची उत्पादकता वाढविता यावी यासाठी, पाणी वापर संस्थांची रचना आणि कार्यचालन यांना सांविधिक मान्यता देण्याचे, राज्य शासनाने ठरविले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी, आवश्यक त्या तरतुदी करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १८ ऑगस्ट २००४ रोजी महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अध्यादेश, २००४ हा प्रख्यापित केला होता ; २००४ चा महा. अध्या. २३.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो, या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल आणि वेगवेगळ्या क्षेत्रांकरिता आणि वेगवेगळ्या तरतुदींकरिता वेगवेगळे दिनांक नियत करता येतील :

परंतु, कलम ५ अन्वये ज्यांच्या बाबतीत अधिसूचना काढण्यात आलेली नाही अशा क्षेत्रांच्या बाबतीत, अशा क्षेत्रांमध्ये तो अंमलात येणार नाही आणि त्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ च्या तरतुदी लागू असणे चालू राहील. १९७६चा महा. ३८.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(एक) (क) " पुरेशा दुरुस्त्या आणि नूतनीकरण " या संज्ञेचा कालवा व्यवस्था

पाणी वापर संस्थेकडे सोपविण्याच्या संबंधातील अर्थ, पाणी वापर संस्थांच्या कार्यक्षेत्रातील सर्व क्षेत्रांमध्ये प्रवाहाद्वारे निर्देशित विसर्ग जाण्यासाठी, पाण्याचे नियंत्रण व त्याची मोजणी करण्यासाठी, पाण्याच्या पातळीचे विनियमन करण्यासाठी आणि पाणी पोचविण्यासाठी, आवश्यक असतील अशा दुरुस्त्या व नूतनीकरण, असा आहे ;

(ख) " करारनामा " याचा अर्थ सिंचनासाठी घनमापन तत्त्वावरील पाणीपुरवठा करण्याकरिता आणि प्रचालन, परिरक्षण व व्यवस्थापन यासाठी भौतिक व्यवस्था सोपविणे यांकरिता पाणी वापर संस्था आणि उच्चस्तरीय पाणी वापर संस्था किंवा, यथास्थिति, कालवा अधिकारी यांच्यातील करारनामा, असा आहे ;

(ग) " अनुज्ञेय हक्काच्या पाण्याचे प्रमाण (पाण्याचा कोटा) " याचा जलाशयावर आधारित कालवा व्यवस्थेच्या संबंधातील अर्थ, समुचित प्राधिकरणाने, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनुसार प्रगणित केल्याप्रमाणे कोणत्याही वर्षात पाणी वापर संस्थेला कबूल केलेल्या पुरवठा स्थानावर पुरविण्याची हमी घेतलेल्या पाण्याचे एकूण परिमाण, असा आहे आणि एकच पाणी वापर संस्था असणाऱ्या लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत, कालव्याच्या मुखाशी सिंचनाकरिता उपलब्ध असलेले पाणी, असा आहे ;

१९७६ चा महा. ३८. (घ) " समुचित प्राधिकरण " याचा अर्थ, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या कलम २ च्या खंड (२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले समुचित प्राधिकरण, असा आहे आणि त्यात, राज्य शासनाने राज्य अधिनियमाद्वारे स्थापन केलेल्या, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण आणि राज्य शासनाने राज्य विधानमंडळाच्या अधिनियमांद्वारे स्थापन केलेले पाटबंधारे विकास महामंडळे यांचा समावेश होतो ;

(ङ) " कार्यक्षेत्र " याचा पाणी वापर संस्थेच्या संबंधातील अर्थ, अशा संस्थेच्या संबंधात कलम ५ अन्वये अधिसूचित केलेले क्षेत्र, असा आहे ;

(च) " कालवा अधिकारी " याचा अर्थ, या अधिनियमान्वये अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाने, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ज्यास यथोचितरित्या अधिकार प्रदान केले आहेत असा, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ च्या कलम २ च्या खंड (४) अन्वये नियुक्त केलेला कालवा अधिकारी, असा आहे ; (१९७६ चा महा. ३८.)

(छ) " कालवा व्यवस्था " याचा अर्थ, सर्व कालवे, असा आहे आणि त्यामध्ये त्यांच्या लाभक्षेत्राखाली येणाऱ्या सर्व जमिनी, यांचा समावेश होतो ;

(ज) " लाभक्षेत्र " याचा, कालव्यावरील प्रवाही व उपसा सिंचन यांच्या संबंधातील अर्थ, ज्याकरिता पाणी वापर संस्थेची स्थापना करण्यात आली आहे अशी, जलशास्त्रीय किंवा अन्य सीमांनी बांधलेली, कालव्याच्या सिंचनयोग्य लाभक्षेत्राखालील जमीन, असा आहे ;

(झ) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, कलम ३८ अन्वये, नियुक्त करण्यात आलेला प्राधिकारी, असा आहे ;

(ञ) " लागवडयोग्य लाभक्षेत्र " याचा अर्थ, जे लागवडयोग्य असेल आणि कालवा व्यवस्थेमार्फत सिंचन सुविधा मिळवू शकेल असे, सिंचन प्रकल्पाखालील क्षेत्र, असा आहे ;

(ट) " तुटीचे वर्ष " याचा, अपवाहन पद्धती किंवा जलाशयावर आधारित कालवा व्यवस्था यांच्या संबंधातील अर्थ, बांधकामाच्या मुखाजवळील पाण्याची उपलब्धता सर्वसाधारण वर्षातील उपलब्धतेपेक्षा कमी असेल ते वर्ष, असा आहे ;

(ठ) " निर्देशित विसर्ग " याचा अर्थ, एखाद्या कालव्याला त्याचे पुनरुज्जीवन किंवा, यथास्थिति, नूतनीकरण केल्यानंतर वाहून नेता येईल असा निर्देशित विसर्ग किंवा सुधारित निर्देशित विसर्ग, असा आहे ;

(ड) " हक्काच्या पाण्याचे प्रमाण " याचा अर्थ, समुचित प्राधिकरणाने, वेळोवेळी, निर्धारित केलेले हक्काच्या पाण्याचे एकत्रित प्रमाण किंवा हक्काच्या पाण्याचे व्यक्तिगत प्रमाण, असा आहे ;

(ढ) " सर्वसदस्य मंडळ " याचा, पाणी वापर संस्थेच्या संबंधातील अर्थ, अशा संस्थेच्या सर्व सदस्यांचे मंडळ, असा आहे ;

(ण) " जलशास्त्रीय तत्त्व " याचा अर्थ, कालवा, वितरिका, लघुवितरिका, उपलघुवितरिका, शेतचारी आणि उपसा सिंचन योजना किंवा पंपाद्वारे उद्धरण करून सिंचन करणाऱ्या आणि यांसारख्या एक किंवा अधिक जलशास्त्रीय संरचना असलेल्या पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यासाठीचे तत्त्व, असा आहे ;

(त) " सिंचन विकास महामंडळ " याचा अर्थ, राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे राज्य शासनाकडून उभारण्यात आलेले सिंचन विकास महामंडळ, असा आहे ;

(थ) " सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन याखालील जमिनी " याचा अर्थ, जेथे परिरक्षणाची जबाबदारी आणि सर्व संबंधित बाबींसह सिंचनयोग्य पाण्याच्या वाटपाचे व्यवस्थापन पाणी वापर संस्थेकडे हस्तांतरित करण्यात आले आहे अशी, कालव्याच्या लाभक्षेत्राखालील जमीन, असा आहे ;

(द) " उपसा सिंचन " किंवा " उपसा सिंचन योजना " याचा, उपसा सिंचन पाणी वापर संस्था यांच्या संबंधातील अर्थ, जेथे पाणी उचलण्यास शासनाची परवानगी लागते अशा सर्व ठिकाणच्या उपसा सिंचन योजना असा आहे, मात्र त्यात खाजगी विहिरी व विंधन विहिरी यांचा समावेश होत नाही ;

(ध) " उपसा सिंचन पाणी वापर संस्था " याचा, सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन याच्या संबंधातील अर्थ, उपसा सिंचनाच्या प्रयोजनासाठी कलम ४३ अनुसार घटित केलेली, विहित करण्यात आलेल्या पद्धतीने नोंदणी केलेली संस्था, असा आहे ;

(न) " महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण " याचा अर्थ, राज्यात जलसंपत्तीच्या नियमनाकरिता राज्य शासनाने राज्य अधिनियमाद्वारे स्थापन केलेले प्राधिकरण, असा आहे ;

(प) " मोठे पाटबंधारे प्रकल्प ", " मध्यम पाटबंधारे प्रकल्प " आणि " लघु पाटबंधारे प्रकल्प " यांचा अर्थ अनुक्रमे दहा हजार हेक्टरपेक्षा अधिक असलेले, दोन हजार हेक्टरपेक्षा अधिक असेल परंतु दहा हजार हेक्टरहून अधिक नसलेले, आणि दोन हजार हेक्टरपेक्षा अधिक नसेल, इतके लागवड योग्य लाभक्षेत्र असलेला प्रकल्प असा आहे ;

(फ) " सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन " याचा अर्थ, कालवा व्यवस्थेचे नियोजन, संकल्पन, बांधकाम, पर्यवेक्षण, अर्थपुरवठा, कार्यचालन, व्यवस्थापन, परिरक्षण, संनियंत्रण आणि मूल्यमापन यांसह सिंचनाच्या सर्व बाबींमध्ये सिंचन वापरकर्त्यांचा सहभाग, असा आहे ;

(ब) " सदस्य " याचा अर्थ, पाणी वापर संस्थांच्या आराखडा क्षेत्रातील जमीनधारक किंवा भोगवटादार पाणी वापर संस्थेचा सदस्य, असा आहे आणि त्यात, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये घटित केलेल्या, दुसऱ्या एखाद्या उच्चस्तरीय संस्थेच्या पाणी वापर संस्थेचा समावेश होतो ;

(भ) " बिगरसिंचन पाणीपुरवठा, " याचा अर्थ, सिंचन प्रकल्पांतून बिगरसिंचन प्रयोजनांसाठी केला जाणारा पाणीपुरवठा, असा आहे आणि त्यात घरगुती, औद्योगिक, वीज निर्मिती, मत्स्यव्यवसाय आणि समुचित प्राधिकरण वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी इतर प्रयोजने यासाठी केलेल्या पाणीपुरवठ्याचा अंतर्भाव होतो ;

(म) " सर्वसाधारण वर्ष " याचा, अपवाहन पद्धतीच्या किंवा जलाशयावर आधारित कालवा पद्धतीच्या संबंधातील अर्थ, ज्यावर्षी प्रकल्प मुखाजवळील पाण्याची उपलब्धता (जलाशयातून उपसा करण्यास अनुज्ञेय पाणी आणि त्यामधील व्यय) ही, सिंचन प्रकल्प अहवालानुसार अपेक्षित असल्याप्रमाणे किंवा नंतर राज्य शासनाने सुधारित केल्याप्रमाणे असेल, असे वर्ष, असा आहे ;

(य) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(कक) " हक्काच्या पाणी वापराचे विहित युनिट (unit) " याचा, जलाशयावर आधारित कालवा व्यवस्थेच्या संबंधातील अर्थ, सर्वसाधारण वर्षामधील बिगरसिंचन प्रयोजनांसाठी पूर्वमंजुरी आणि कालवा व्यवस्थेतून होणारे सर्व फायदे-तोटे विचारात घेतल्यानंतर, एक सिंचनवर्ष किंवा हंगाम यामध्ये पाणी वापर संस्थेच्या पाणीपुरवठ्याच्या जागी लागवडयोग्य लाभक्षेत्रामधील एका हेक्टरसाठी उपलब्ध करून दिलेल्या पाण्याचे एकूण आकारमान, असा आहे ;

(कख) " देय पाण्याचे विहित प्रमाण " याचा, जलाशयावर नसलेल्या कालवा व्यवस्थेच्या संबंधातील अर्थ, लाभक्षेत्राच्या पाणीपुरवठा स्थानावर मोजणी केल्यानुसार, लागवडयोग्य लाभक्षेत्राच्या प्रत्येक हेक्टरसाठी वाटपयोग्य पाण्याचा विसर्ग, असा आहे ;

(कघ) " मागील थकबाकी " याचा, पाणीपट्टीची आकारणी व वसुली याबाबतीतला अर्थ, पाणी वापर संस्थेच्या सदस्यांकडून देय असलेली परंतु, पाणी वापर संस्थांनी व्यवस्थापन हाती घेण्यापूर्वी चुकती न केलेली रक्कम, असा आहे ;

(कध) " जलाशयावर आधारित कालवा व्यवस्था " याचा अर्थ, वापरासाठी किती पाणी उपलब्ध होऊ शकेल याचा अंदाज वर्तविण्यासाठी किमान विवक्षित टक्केवारीइतके पाणी साठवून ठेवण्यात येते अशी कालवा व्यवस्था, असा आहे ;

(कङ) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले नियम, असा आहे ;

(कच) " वाराबंदी पाणीपुरवठा (RWS) " याचा अर्थ, ज्यात पुरवठ्याचा दिवस, अवधी आणि वेळ दर्शविणाऱ्या मान्य वेळापत्रकानुसार पाणी वापरणाऱ्यांना आळीपाळीने पाणीपुरवठा केला जातो अशी पद्धत, असा आहे ;

(कछ) " पाणी वापर हक्कांचे मंजूर प्रमाण " याचा, जलाशयावर आधारित कालवा व्यवस्थेबरोबर पाणी वापर संस्थांनी केलेल्या करारासंबंधात अर्थ, सर्वसाधारण वर्षातील, वेगवेगळया हंगामांमध्ये मान्य केलेल्या पुरवठा स्थानावरून, पाणी वापर संस्थांना हमीने पुरवठा करावयाच्या पाण्याचे एकूण प्रमाण, असा आहे ;

(कज) " राज्य शासन " किंवा " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(कझ) " विपुलतेचे वर्ष " याचा, अपवाहन पद्धती व्यवस्था किंवा जलाशयावर आधारित कालवा व्यवस्था यांच्या संबंधातील अर्थ, ज्या वर्षात बांधकामाच्या मुखाजवळील पाण्याची उपलब्धता ही, सर्वसाधारण वर्षातील पाण्याच्या उपलब्धतेपेक्षा अधिक असते असे वर्ष, असा आहे ;

(कञ) " पाण्याचे प्रमाण " याचा अर्थ, पाणी वापर संस्थेसाठी पुरवठा स्थानावरून नियतवाटप केल्या जाणाऱ्या पाण्याचे विमोचन, असा आहे ;

(कट) " पाणी वापरकर्ते " याचा अर्थ, शासनाच्या सिंचन स्रोतातून, पाण्याचा वापर करणारी, कोणतीही व्यक्ती किंवा निगम निकाय किंवा संस्था, असा आहे ;

(कढ) " पाणी वापर संस्था " याचा, सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन या संबंधातील अर्थ, प्रवाही सिंचन तसेच उपसा सिंचनाकरिता कालवा व्यवस्थेच्या सर्व स्तरावरील, पाणी वापर संस्थेचे सर्व प्रकार, असा आहे ;

(कड) " लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था " याचा अर्थ, पाणी वापर संस्थेची प्राथमिक शाखा, असा आहे ;

(दोन) या अधिनियमात वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या करण्यात न आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ यात जो अर्थ नेमून दिलेला आहे तोच अर्थ राहील.

१९७६ चा महा. ३८.

## प्रकरण दोन

### पाणी वापर संस्था व तिच्या लाभक्षेत्राच्या आराखड्याची निश्चिती करणे

पाणी वापर संस्था एक निगम निकाय असणे.

३. या अधिनियमाखाली घटित केलेली पाणी वापरकर्त्यांची प्रत्येक संस्था ही, वेगळे नाव, अखंड परंपरा व सामान्य मुद्रा असलेला एक निगम निकाय असेल व ज्या प्रयोजनांसाठी तो घटित करण्यात आला असेल त्या प्रयोजनांसाठी त्याला मालमत्ता संपादित करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा, करार करण्याचा आणि आवश्यक, उचित व इष्ट असतील अशा सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल, तसेच त्याच्या निगम नावाने त्याला किंवा त्याच्याविरुद्ध दावा दाखल करता येईल :

परंतु, कोणत्याही पाणी वापर संस्थेत कार्यचालन व व्यवस्थापन करण्याकरिता शासनाने तिच्याकडे निहित केलेल्या कोणत्याही मालमत्तेचे, कोणत्याही रीतीने अन्यसंक्रामण करण्याचा अधिकार असणार नाही.

पाणी वापर संस्थेचे उद्देश.

४. (१) पाणी वापर संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) तिच्या सदस्यांमध्ये समन्यायी पाणी वाटपास चालना देणे व ते सुनिश्चित करणे ;

(दोन) सिंचन व्यवस्थांची पुरेशी निगा राखणे आणि अधिकाधिक कृषी उत्पादन करण्यासाठी पाण्याचे कार्यक्षमतेने, काटकसरीने व समानतेने वितरण आणि वापर करण्याबाबत सुनिश्चिती करणे ;

(तीन) पर्यावरणाचे संरक्षण करणे ;

(चार) पारिस्थितीकीय (Ecological) समतोल राखणे ;

(पाच) सिंचन व्यवस्थेबाबत आपलेपणाची जाणीव सदस्यांच्या मनावर ठसवून, त्यांना त्यामध्ये सक्रिय सहभागी करून घेणे ;

(सहा) कार्यक्षेत्रातील सिंचन व शेती संबंधात सदस्यांच्या सामाईक हिताचे रक्षण करणे व त्याला चालना देणे.

(२) संस्थेस, पाण्याच्या इष्टतम वापरासाठी ठिबक व तुषार सिंचनपद्धती सुरू करणे ; भूजलाचा उपयोग करून घेण्यासाठी शेतातील तळी आणि सामुदायिक प्रकल्प (Community Project) यांचा विकास करणे ; बी-बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके यांचे प्रापण व वितरण करणे ; शेतीच्या अवजारांचे प्रापण करणे व ती भाड्याने देणे ; लाभक्षेत्रातील शेती उत्पन्नाचे पणन व त्यावर प्रक्रिया करणे, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय या सारखे इतर जोडधंदे तसेच, सिंचन व शेतीच्या संबंधातील, लाभक्षेत्रातील सदस्यांच्या सामाईक हिताच्या कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होता येईल.

सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन या योजनेखालील कार्यक्षेत्र निश्चित करणे.

५. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, समुचित प्राधिकरणास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, जलशास्त्रीय तत्त्वावर आणि प्रशासनिक सोय लक्षात घेऊन, या अधिनियमान्वये पाणी वापर संस्था घटित करण्याच्या प्रयोजनार्थ, सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन व्हावयाच्या क्षेत्रामधील सिंचन प्रकल्पाच्या लाभक्षेत्राचा आराखडा निश्चित करता येईल आणि वेळोवेळी, तशा प्रकारच्या अधिसूचनेद्वारे,—

(एक) पाणी वापर संस्था एकत्रित किंवा विभाजित करून ;

(दोन) कोणत्याही पाणी वापर संस्थेचे क्षेत्र वाढवून ;

(तीन) कोणत्याही पाणी वापर संस्थेचे क्षेत्र कमी करून,

—त्याच्या सीमांमध्ये बदल करता येईल :

परंतु, त्यामुळे परिणाम होण्याची शक्यता असलेल्या पाणी वापर संस्थेला आणि भूधारकांना किंवा भोगवटादारांना विहित करण्यात आल्याप्रमाणे वाजवी संधी दिल्याखेरीज पाणी वापर संस्थांचे विभाजन करणारी, त्यामध्ये वाढ करणारी, किंवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारे बदल करणारी अशी कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणतीही पाणी वापर संस्था आणि भूधारक किंवा भोगवटादार हे पूर्वीच्या पाणीवापर संस्थचे ना थकबाकी प्रमाणपत्र (No dues Certificate) सादर केल्याखेरीज इतर कोणत्याही पाणी वापर संस्थेचे सदस्यत्व मिळविण्यास पात्र असणार नाही.

लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या लाभक्षेत्राची निश्चिती करणे.

६. (१) कार्यकारी अभियंता या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या व या संदर्भात यथायोग्यरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि जलशास्त्रीय तत्त्वावरील नियमांना अनुसरून आणि प्रशासनिक सोयीच्या दृष्टीने, सिंचनयोग्य लाभक्षेत्राखालील जमिनीमध्ये, लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या लाभक्षेत्राची निश्चिती स्वतंत्रपणे करता येईल आणि असे क्षेत्र हे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी लघुवितरिका

स्तरावरील पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र म्हणून घोषित करता येईल. अशा प्रकारे घोषित केलेल्या कार्यक्षेत्रामध्ये प्रवाही सिंचन आणि उपसा सिंचन या दोन्ही सिंचन पद्धतींचा अंतर्भाव असू शकेल.

(२) पोट-कलम (१) खालील अधिसूचनेमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल,—

(क) पाणी वापर संस्थेचे कार्यचालन आणि व्यवस्थापन करण्याकरिता आवश्यक असलेला विहित तपशील दर्शविणाऱ्या, त्या संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या अद्ययावत नकाशाची प्रमाणित प्रत ;

(ख) लघुवितरिका स्तरीय पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील भूधारकांच्या व भोगवटादारांच्या अद्ययावत यादीची विहित तपशिलासह प्रमाणित प्रत ;

(३) पोट-कलम (१) खालील अधिसूचनेला विहित केल्याप्रमाणे भरपूर प्रसिद्धी देण्यात येईल आणि कालवा अधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा अन्य रीतीने लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रात किंवा कार्यक्षेत्राच्या अशा जवळपासच्या भागातही ती प्रसिद्ध करण्यात येईल.

(४) पोट-कलम (१) खालील अधिसूचनेची प्रत मिळविण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या संदर्भात अर्ज केल्यावर आणि विहित करण्यात येईल अशी फी भरल्यावर, ती प्रत मिळविता येईल.

(५) पोट-कलम (१) खालील अधिसूचनेमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, ती अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, राज्य शासन अधिसूचित करील अशा कालवा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल :

परंतु, राज्य शासन, अधीक्षक अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा असेल अशा कालवा अधिकाऱ्यास अपील अधिकारी म्हणून अधिसूचित करणार नाही.

(६) अपील अधिकाऱ्यास त्या अपीलामध्ये त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल आणि अधिसूचनेत फेरबदल करणारा आदेश काढण्यात आल्यास अशी अधिसूचना, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत व अशा तारखेपासून फेरबदल केल्याप्रमाणे लागू असेल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस बाधा पोहोचविणाऱ्या अशा कोणत्याही अधिसूचनेत किंवा तिच्या भागात बदल करणारा किंवा तीत सुधारणा करणारा कोणताही आदेश, त्या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज काढण्यात येणार नाही.

७. कलम ६ अन्वये राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पाणी वापर संस्थेचे लाभक्षेत्र निश्चित केल्यावर समुचित प्राधिकरण, व्यक्तिगत जमीनधारकाला किंवा भोगवटादाराला पाण्याचा पुरवठा करणार नाही आणि सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन या खाली येणाऱ्या जमिनींच्या सर्व धारकांवर व भोगवटादारांवर पाणी वापर संस्थेमार्फत पाणीपुरवठा करून घेणे बंधनकारक असेल.

**लघुवितरिका स्तरावर पाणी वापर संस्था घटित करणे.**

८. (१) कलम ६ अन्वये, लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यात येईल त्या बाबतीत, अशा प्रकारे निश्चित केलेल्या जमिनीचे धारक व भोगवटादार हे, पाणी वापर संस्थेची स्थापना करतील. अशा पाणी वापर संस्थेची विहित पद्धतीनुसार नोंदणी करण्यात येईल :

परंतु, अशी कोणतीही पाणी वापर संस्था घटित करण्यात आली नसेल तर, समुचित प्राधिकरणास, अशी संस्था घटित व कार्यान्वित करण्यात येईपर्यंत, अशा पाणी वापर संस्थेची कार्ये विहित रीतीने, सरकारी अभिकरणे, सहकारी संस्थांकडे किंवा इतर पाणी वापर संस्थांकडे सोपविता येतील.

(२) लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या निश्चित केलेल्या क्षेत्रातील सर्व भूधारक व भोगवटादार हे. लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचे सदस्य असल्याचे मानण्यात येईल. आणि ते, पाणी वापर संस्थेचे सर्वसदस्य मंडळ घटित करतील व त्यांना विहित केल्याप्रमाणे मतदानाचा अधिकार असेल.

**लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती आणि तिच्या संचालकांची व अध्यक्षांची निवडणूक.**

९. (१) प्रत्येक लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेकरिता, अध्यक्ष व संचालक यांसह विहित केले असतील एवढे सदस्य असलेली एक व्यवस्थापन समिती असेल. अशा संस्थेकरिता विहित केल्याप्रमाणे अर्हता धारण केलेला एक सचिव असेल व त्याचे वेतन विहित केल्याप्रमाणे संबंधित पाणी वापर संस्था निश्चित करील.

(२) या संदर्भात यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेला कालवा अधिकारी, लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांची विहित करण्यात येईल अशा कालावधीमध्ये व अशा रीतीने, पाणी वापर संस्थेच्या सदस्यांमधून थेट निवडणूक घेऊन निवड करण्याची व्यवस्था करील.

(३) व्यवस्थापन समितीवर, पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या सुरुवातीच्या, मधल्या व शेवटच्या भागातील भूधारकांना किंवा भोगवटादारांना आणि महिला सदस्यांना, विहित करण्यात येईल अशा रीतीने पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात येईल.

(४) असा कालवा अधिकारी, विहित करण्यात येईल अशा रीतीने, लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेची अध्यक्ष निवडून देण्याची व्यवस्था करील. अध्यक्षाची निवड होईपर्यंत, व्यवस्थापन समितीचे संचालक अशा कालवा अधिकाऱ्याने बोलाविलेल्या व त्याच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या व्यवस्थापन समितीच्या पहिल्या बैठकीत, अध्यक्षाची निवड करतील.

(५) अध्यक्षाचा पदावधी व ते पद पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या सुरुवातीच्या, मधल्या व शेवटच्या भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांमधून व महिला संचालकांमधून आळीपाळीने भरणे. या बाबी, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील :

परंतु, एखादा भूधारक किंवा भोगवटादार हा, एकाहून अधिक पाणी वापर संस्थांच्या कार्यक्षेत्रातील जमीन धारण करीत असेल किंवा तिचा उपभोग घेत असेल त्या बाबतीत, अशा व्यक्तीने विहित रीतीने ज्या पाणी वापर संस्थेचा स्वीकार केला असेल केवळ त्याच संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालक पदासाठीच्या निवडणुकीमध्ये भाग घेण्यास तो पात्र असेल.

(६) कालवा अधिकाऱ्यास, कारणे लेखी नमूद करून त्या कारणांवरून निवडणुका, एक वर्षापर्यंत पुढे ढकलता येतील.

(७) व्यवस्थापन समितीच्या संचालकांना कलम १९ अन्वये अगोदरच पदावरून माघारी बोलावण्यात आले नसेल तर, ते, उक्त व्यवस्थापन समितीच्या स्थापनेच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी पदावर राहतील.

(८) या अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे व विहित केल्याप्रमाणे व्यवस्थापन समिती, पाणी वापर संस्थेच्या अधिकारांचा वापर करील, तिच्या कर्तव्यांचे पालन करील व तिची कार्ये पार पाडील.

(९) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत करण्यात आले असले तरीही, या संदर्भात यथोचितरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यास, व्यवस्थापन समितीची निवडणूक होऊन व्यवस्थापन समिती घटित करण्यात येईपर्यंत, विहित पद्धतीने तदर्थ व्यवस्थापन समिती नियुक्त करता येईल.

**वितरिका स्तरीय संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चित करणे.**

**१०.** (१) कार्यकारी अभियंता या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या व या संदर्भात यथोचित अधिकार प्रदान केलेल्या कालवा अधिकाऱ्यास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे व या अधिनियमाखाली केलेल्या नियमांना अनुसरून जलशास्त्रीय तत्त्वावर आणि प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने, सिंचनयोग्य लाभक्षेत्राखालील जमिनींमध्ये, वितरिका स्तरावरील संस्थेचे लाभक्षेत्र निश्चित करता येईल आणि ते क्षेत्र या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ वितरिका स्तरावरील संस्थेचे कार्यक्षेत्र म्हणून घोषित करता येईल. अशा रीतीने घोषित केलेल्या क्षेत्रांत प्रवाही सिंचन आणि उपसा सिंचन या दोन्हींचा अंतर्भाव असेल.

(२) पोट-कलम (१) खालील अधिसूचनेमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल :---

(क) वितरिका स्तरीय संस्थेखालील कालवा व्यवस्थेचे कार्यचालन आणि व्यवस्थापन करण्याकरिता आवश्यक असलेला विहित तपशील दर्शविणाऱ्या, त्या संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या अद्ययावत नकाशाची प्रमाणित प्रत ;

(ख) वितरिका स्तरीय संस्थेमध्ये अंतर्भूत केलेल्या, लघुवितरिका स्तरावरील संस्थांच्या अद्ययावत यादीची, विहित तपशीलासह प्रमाणित प्रत.

(३) कलम ६ च्या पोट-कलमे (३), (४), (५) व (६) च्या तरतुदी, पोट-कलम (१) खालील अधिसूचनेस, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

**वितरिका स्तरीय संस्था घटित करणे.**

**११.** (१) कलम १० अन्वये, वितरिका स्तरीय संस्थेचे कार्यक्षेत्र म्हणून निश्चित केलेल्या क्षेत्रामध्ये, लघुवितरिका स्तरीय पाणी वापर संस्थेकडून एक वितरिका स्तरीय संस्था घटित करण्यात येईल. अशा संस्थेची विहित रीतीने नोंदणी करण्यात येईल.

(२) वितरिका स्तरीय संस्थेच्या लाभक्षेत्रातील, लघुवितरिका स्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे संचालक प्रतिनिधित्व करीत असलेल्या सर्व लघुवितरिका स्तरीय पाणी वापर संस्था, एका वितरिका स्तरीय संस्थेचे सर्वसदस्य मंडळ घटित करतील आणि त्यांना विहित करण्यात येईल अशा रीतीने मतदानाचा व वितरिका स्तरीय संस्थेची व्यवस्थापन समिती निवडण्याचा अधिकार असेल.

(३) अशा वितरिका स्तरीय संस्थेकडे, निश्चित केलेल्या क्षेत्राचे कार्यचालन व देखभाल सोपविल्यानंतर, अशा सीमांकित क्षेत्रातील पाणी वापरकर्त्यांना केवळ संबंधित वितरिका स्तरीय संस्थेमार्फत पाणीपुरवठा केला जाईल.

वितरिका स्तरीय संस्थेची व्यवस्थापन समिती आणि संचालकांची व अध्यक्षाची निवडणूक.

**१२.** (१) प्रत्येक वितरिका स्तरीय संस्थेकरिता एक व्यवस्थापन समिती असेल आणि उक्त समितीमध्ये अध्यक्ष व संचालक यांसह विहित करण्यात येईल इतक्या संख्येतील सदस्यांचा समावेश असेल. अशा संस्थेकरिता एक सचिव असेल. असा सचिव विहित केल्याप्रमाणे अर्हता धारण केलेला असेल व त्याचे वेतन विहित केल्याप्रमाणे संबंधित पाणी वापर संस्था निश्चित करील.

(२) या संदर्भात यथोचित अधिकार प्रदान करण्यात आलेला कालवा अधिकारी, लघु वितरिका स्तरीय संस्थेच्या सर्वसदस्य मंडळाच्या सदस्यांमधून निवडणूक घेऊन, विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा रीतीने वितरिका स्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे संचालक निवडण्याची व्यवस्था करील.

(३) पाणी वापर संस्थेच्या वितरिका स्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर, वितरिका स्तरीय संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या सुरूवातीच्या, मधल्या व शेवटच्या भागांमधील पाणी वापर संस्थांना तसेच महिला संचालकांना विहित रीतीने, पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात येईल.

(४) असा कालवा अधिकारी, विहित करण्यात येईल अशा रीतीने, वितरिका स्तरीय संस्थेच्या अध्यक्षाच्या निवडणुकीचीही व्यवस्था करील. अध्यक्षांची निवड होईपर्यंत व्यवस्थापन समितीचे संचालक अशा कालवा अधिकाऱ्याने बोलाविलेल्या व त्याच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या व्यवस्थापन समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये अध्यक्षाची निवड करतील.

(५) अध्यक्षपदाचा अवधी आणि वितरिका स्तरीय संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या सुरूवातीच्या मधल्या व शेवटच्या भागाचे प्रतिनिधित्व करणारे व्यवस्थापन समितीचे संचालक आणि महिला संचालक यांना ते आळीपाळीने देण्याची पद्धत, विहित केल्याप्रमाणे असेल.

(६) कालवा अधिकाऱ्याला, कारणे लेखी नमूद करून, त्या कारणांसाठी एक वर्षापर्यंत निवडणुका पुढे ढकलता येतील.

(७) व्यवस्थापन समितीचे संचालक जर त्यांना कलम १९ अन्वये अगोदरच पदावरून माघारी बोलावण्यात आले नसेल तर, उक्त व्यवस्थापन समितीची स्थापना केल्याच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करतील.

(८) या अधिनियमात किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांत तरतूद केल्याप्रमाणे, व्यवस्थापन समिती, वितरिका स्तरीय संस्थेच्या अधिकारांचा वापर करील, कर्तव्यांचे पालन करील व कार्ये पार पाडील.

(९) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरीही, या बाबतीत यथोचित अधिकार प्रदान केलेल्या कालवा अधिकाऱ्याला, व्यवस्थापन समिती निवडून येऊन ती घटित होईपर्यंत, विहित केलेल्या रीतीने, तदर्थ व्यवस्थापन समितीची नियुक्ती करता येईल.

कालवा स्तरीय संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चित करणे.

**१३.** (१) या बाबतीत यथोचित अधिकार प्रदान केलेल्या, कार्यकारी अभियंत्याच्या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या कालवा अधिकाऱ्याला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि नियमांना अनुसरून, जलशास्त्रीय तत्त्वावर व प्रशासकीय सोयीनुसार, सिंचनयोग्य लाभक्षेत्राखाली येणाऱ्या जमिनीवर कालवा स्तरीय संस्थेचे लाभक्षेत्र निश्चित करता येईल आणि या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, ते, कालवा स्तरीय संस्थेचे कार्यक्षेत्र म्हणून घोषित करता येईल. अशा रीतीने घोषित केलेल्या कार्यक्षेत्रामध्ये प्रवाही व उपसा सिंचन या दोहोंचा अंतर्भाव असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेत पुढील बाबींचा समावेश असेल :---

(क) कार्यचालन व व्यवस्थापन यासाठी आवश्यक असणारा विहित तपशील दर्शविणारी, कालवा स्तरीय संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या अद्ययावत नकाशाची प्रमाणित प्रत ;

(ख) कालवा स्तरीय संस्थेमध्ये अंतर्भूत असलेल्या वितरिका स्तरीय संस्थांच्या अद्ययावत यादीची विहित तपशीलासह प्रमाणित प्रत ;

(३) कलम ६ च्या पोट-कलमे (३), (४), (५) व (६) च्या तरतुदी, पोट-कलम (१) खालील अधिसूचनेस, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

कालवा स्तरीय संस्था घटित करणे.

१४. (१) कलम १३ अन्वये, कालवा स्तरीय संस्थेचे कार्यक्षेत्र म्हणून निश्चित केलेल्या क्षेत्रामध्ये, वितरिका स्तरीय संस्थेद्वारे एक कालवा स्तरीय संस्था घटित करण्यात येईल. अशा संस्थेची विहित रीतीने नोंदणी करण्यात येईल.

(२) कालवा स्तरीय संस्थेच्या लाभक्षेत्राखालील, वितरिका स्तरीय संस्थांच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांकडून प्रतिनिधित्व केल्या जाणाऱ्या सर्व वितरिका स्तरीय संस्था, कालवा स्तरीय संस्थेचे सर्वसदस्य मंडळ घटित करतील व त्यांना मतदान करण्याचा हक्क असेल आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने त्या, कालवा स्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीची निवड करतील.

(३) निश्चित केलेल्या क्षेत्राचे कार्यचालन व परिरक्षण, कालवा स्तरीय संस्थेकडे हस्तांतरित केल्यानंतर, अशा निश्चित केलेल्या क्षेत्रातील पाणी वापरकर्त्यांना, केवळ संबंधित कालवा स्तरीय संस्थांमार्फतच पाणीपुरवठा करण्यात येईल.

कालवा स्तरीय संस्थेची व्यवस्थापन समिती आणि तिच्या संचालकांची आणि अध्यक्षाची निवडणूक.

१५. (१) प्रत्येक कालवा स्तरीय संस्थेची एक व्यवस्थापन समिती असेल आणि तिच्यामध्ये अध्यक्ष व संचालक यांसह विहित करण्यात येईल इतक्या संख्येतील सदस्यांचा समावेश असेल. अशा संस्थेकरिता एक सचिव असेल. असा सचिव विहित केल्याप्रमाणे अर्हता धारण केलेला असेल व त्याचे वेतन विहित केल्याप्रमाणे संबंधित पाणी वापर संस्था निश्चित करील.

(२) याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेला कालवा अधिकारी, विहित करण्यात येईल अशा कालावधीत आणि अशा रीतीने, कालवा स्तरीय संस्थेच्या सर्वसदस्य मंडळाच्या सदस्यांकडून निवडणुकीद्वारे कालवा स्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांच्या निवडणुकीची व्यवस्था करील.

(३) कालवा स्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर, कालवा स्तरीय संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या मुखाजवळच्या, मधल्या आणि शेवटच्या भागांमधील वितरिका स्तरीय संस्थांना आणि महिला संचालकांना विहित रीतीने पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात येईल.

(४) असा कालवा अधिकारी, विहित करण्यात येईल अशा रीतीने, कालवा स्तरीय संस्थांच्या अध्यक्षाच्या निवडणुकीची व्यवस्थाही करील. अध्यक्षाची निवड होईपर्यंत व्यवस्थापन समितीचे संचालक अशा कालवा अधिकाऱ्याने बोलाविलेल्या व त्याच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या व्यवस्थापन समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये अध्यक्षाची निवड करतील.

(५) अध्यक्षाचा पदावधी, आणि कालवा स्तरीय संस्थांच्या कार्यक्षेत्राच्या मुखाजवळच्या, मधल्या व शेवटच्या भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संचालकांना आणि महिला संचालकांना ते आळीपाळीने देण्याची पद्धत, हे विहित केल्याप्रमाणे असेल.

(६) कालवा अधिकाऱ्यास, एक वर्षापर्यंत कारणे लेखी नमूद करून, निवडणुका पुढे ढकलता येतील.

(७) व्यवस्थापन समितीचे संचालक जर त्यांना कलम १९ अन्वये, अगोदरच पदावरून माघारी बोलावण्यात आले नसेल तर, उक्त व्यवस्थापन समितीच्या स्थापनेच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीकरिता ते पद धारण करतील.

(८) या अधिनियमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे व विहित केल्याप्रमाणे, व्यवस्थापन समिती कालवा स्तरीय संस्थेच्या अधिकारांचा वापर करील, तिची कर्तव्ये बजावील आणि तिची कार्ये पार पाडील.

(९) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या बाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेल्या कालवा अधिकाऱ्यास, व्यवस्थापन समिती निवडून येऊन घटित होईपर्यंत विहित रीतीने तदर्थ व्यवस्थापन समितीची नियुक्ती करता येईल.

प्रकल्प स्तरीय संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चित करणे.

**१६.** (१) या बाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेल्या, अधीक्षक अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या कालवा अधिकाऱ्यास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि विहित करण्यात आलेल्या नियमांना अनुसरून, प्रकल्पाच्या सिंचनयोग्य लाभक्षेत्राखालील जमिनींचा आराखडा निश्चित करता येईल आणि त्या जमिनी, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी प्रकल्प स्तरीय संस्थेचे कार्यक्षेत्र असल्याचे घोषित करता येईल. अशा प्रकारे घोषित केलेल्या कार्यक्षेत्रामध्ये प्रवाही आणि उपसा सिंचन या दोन्हींचा अंतर्भाव करता येईल.

(२) पोट-कलम (१) खालील अधिसूचनेमध्ये, पुढील गोष्टींचा समावेश असेल :---

(क) प्रकल्पाखालील वेगवेगळ्या स्तरावरील सर्व पाणी वापर संस्थांचे कार्यक्षेत्र दर्शविणाऱ्या प्रकल्प स्तरीय संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या अद्ययावत नकाशाची प्रमाणित प्रत आणि कार्यचालन व्यवस्थापन करण्याकरिता आवश्यक असा इतर विहित तपशील ;

(ख) प्रकल्प स्तरीय संस्थेमध्ये अंतर्भूत असलेल्या, निरनिराळ्या स्तरावरील सर्व पाणी वापर संस्थांच्या अद्ययावत यादीची विहित तपशीलासह प्रमाणित प्रत.

(३) कलम ६ च्या पोट-कलमे (३), (४), (५) व (६) च्या तरतुदी, पोट-कलम (१) खालील अधिसूचनेस, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

(४) या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत अधिसूचित कार्यकारी अभियंता हा, प्रकल्प स्तरीय संस्थेच्या कार्यक्षेत्राची निश्चिती करील आणि अधीक्षक अभियंता हा, अपिलीय अधिकारी असेल.

प्रकल्प स्तरीय संस्था घटित करणे.

**१७.** (१) कलम १६ अन्वये, प्रकल्प स्तरीय संस्थेचे कार्यक्षेत्र म्हणून आराखडा निश्चित केलेल्या क्षेत्रामध्ये, प्रकल्पामध्ये काम करणाऱ्या, कालवा स्तरीय संस्थांद्वारे प्रकल्प स्तरीय संस्था घटित करण्यात येईल. अशा संस्थेची विहित केलेल्या रीतीने नोंदणी करण्यात येईल.

(२) प्रकल्पामध्ये आपल्या संबंधित व्यवस्थापन समित्यांद्वारे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्व कालवा स्तरीय संस्था आणि जलाशयावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्था, प्रकल्प स्तरीय संस्थेचे सर्वसदस्य मंडळ घटित करतील आणि त्यांना मतदान करण्याचा व विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रकल्प स्तरीय संस्थेची व्यवस्थापन समिती निवडून देण्याचा हक्क असेल.

(३) आराखडा निश्चित केलेल्या क्षेत्राचे कार्यचालन व परिरक्षण प्रकल्प स्तरीय संस्थेकडे हस्तांतरित केल्यानंतर, अशा आराखडा निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्रातील पाणी वापरकर्त्यांना, संबंधित प्रकल्प स्तरीय संस्थांमार्फतच पाणीपुरवठा करण्यात येईल.

(४) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, प्रशासनिक सोय लक्षात घेऊन, एखाद्या प्रकल्पाच्या संबंधात, कारणे लेखी नमूद करून, कोणत्याही स्तरावरच्या

संस्थेस, प्रकल्प स्तरीय संस्था म्हणून कार्य करण्यासाठी प्राधिकृत करता येईल. अशा प्रकारे प्राधिकृत केल्यानंतर, पोट-कलम (२) च्या तरतुदी आणि प्रकल्प स्तरीय संस्थेस लागू असलेल्या, अधिनियमाच्या इतर तरतुदी अशा संस्थेस योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

प्रकल्प स्तरीय संस्थेची व्यवस्थापन समिती आणि तिच्या संचालकाची आणि अध्यक्षाची निवडणूक.

**१८.** (१) प्रत्येक प्रकल्प स्तरीय संस्थेची एक व्यवस्थापन समिती असेल आणि तिच्यामध्ये, अध्यक्ष व संचालक यांसह विहित करण्यात येईल इतक्या संख्येतील सदस्यांचा समावेश असेल. अशा संस्थेकरिता एक सचिव असेल. असा सचिव विहित केल्याप्रमाणे अर्हता धारण केलेला असेल व त्याचे वेतन विहित केल्याप्रमाणे संबंधित पाणी वापर संस्था निश्चित करील.

(२) याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेला कालवा अधिकारी, विहित करण्यात येईल अशा कालावधीत आणि रीतीने, प्रकल्प स्तरीय संस्थेच्या सर्वसदस्य मंडळाच्या सदस्यांमधून निवडणुकीद्वारे प्रकल्प स्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांच्या निवडणुकीची व्यवस्था करील.

(३) प्रकल्प स्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर, प्रकल्प स्तरीय संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या मुखाजवळच्या, मधल्या आणि शेवटच्या भागांमधील सदस्य-पाणी वापर संस्थांना आणि महिला संचालकांना विहित करण्यात आल्याप्रमाणे पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात येईल.

(४) असा कालवा अधिकारी, विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रकल्प स्तरीय संस्थेच्या अध्यक्षांच्या निवडणुकीची व्यवस्थाही करील. अध्यक्षांची निवड होईपर्यंत व्यवस्थापन समितीचे संचालक अशा कालवा अधिकाऱ्याने बोलाविलेल्या व त्याच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या व्यवस्थापन समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये अध्यक्षाची निवड करतील.

(५) प्रकल्प स्तरीय संस्थांच्या कार्यक्षेत्राच्या मुखाजवळच्या, मधल्या आणि शेवटच्या भागांमधील व्यवस्थापन समितीच्या संचालकांमधून आणि महिला संचालकांमधून प्रतिनिधित्व देण्यासाठी, अध्यक्षाचा पदावधी व ते पद आळीपाळीने देण्याची पद्धत हे, विहित केल्याप्रमाणे असेल.

(६) कालवा अधिकाऱ्यास एक वर्षापर्यंत कारणे लेखी नमूद करून निवडणुका पुढे ढकलता येतील.

(७) व्यवस्थापन समितीचे संचालक कलम १९ अन्वये, जर त्यांना अगोदरच पदावरून माघारी बोलावण्यात आले नसेल तर, उक्त व्यवस्थापन समितीच्या स्थापनेच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीकरिता पद धारण करतील.

(८) या अधिनियमामध्ये तरतूद केल्यानुसार व विहित केल्याप्रमाणे व्यवस्थापन समितीचे संचालक प्रकल्प स्तरीय संस्थेच्या अधिकारांचा वापर करतील आणि त्यांची कार्ये पार पाडतील.

(९) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या बाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेला कालवा अधिकारी, व्यवस्थापन समितीचे निर्वाचन व पदस्थापना होऊन ती अस्तित्वात येईपर्यंत विहित रीतीने तदर्थ व्यवस्थापन समितीची नेमणूक करील.

पदावरून माघारी बोलावण्याची कार्यपद्धती.

**१९.** (१) कोणत्याही स्तरावरील, पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकाला पदावरून माघारी बोलावण्याचा प्रस्ताव पाणी वापर संस्थेच्या, मत देण्याचा हक्क असलेल्या एकूण सदस्य संख्येच्या निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी सही केलेल्या, विहित करण्यात येईल अशा नमुन्यातील लेखी नोटिशीद्वारे देण्यात येईल :

परंतु असा प्रस्ताव, ज्या संचालका विरुद्ध मांडावयाचा आहे, त्याने पदग्रहण केल्यापासून दोन वर्षांच्या आत मांडता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशलेला प्रस्ताव, त्या प्रयोजनांसाठी विशेष करून आमंत्रित केलेल्या सर्वसदस्य मंडळाच्या बैठकीमध्ये उपस्थित असलेल्यांपैकी आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोनतृतीयांश सदस्यांच्या पाठिंब्याने संमत करण्यात आला असेल तर, कालवा अधिकारी, ज्या पदाधिकाऱ्याविरुद्ध प्रस्ताव मांडण्यात आला असेल त्याला, आदेशाद्वारे, पदावरून काढून टाकील आणि परिणामस्वरूप रिक्त पद, हे विहित पद्धतीने भरण्यात येईल.

पाणी वापर संस्थेच्या उप-समित्या घटित करणे.

**२०.** पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीस, या अधिनियमाखाली अशा पाणी वापर संस्थेमध्ये निहित असलेली सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडण्यासाठी उप-समित्या घटित करता येतील.

करार. २१. (१) संबंधित पाणी वापर संस्था घटित झाल्यापासून शक्यतो तीन महिन्यांच्या आत, पाणी वापर संस्था आणि पाणी वापर संस्थांची उच्चस्तरीय संस्था किंवा, यथास्थिति, अधीक्षक अभियंता अथवा कार्यकारी अभियंता हा दर्जा असलेला कालवा अधिकारी यांच्यामध्ये एक करार करण्यात येईल. या करारात कलम २९ मध्ये नमूद केलेल्या मजकुराचा समावेश असेल.

(२) हा करार, विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी विधिग्राह्य असेल.

लाभक्षेत्राची संयुक्त तपासणी, दुरुस्त्या, पुनर्वसन करणे. तसेच आणि त्याचे व्यवस्थापन लघु वितरिका पाणी वापर संस्थेकडे हस्तांतरित करणे.. २२. (१) लघु वितरिका स्तरावर पाणी वापर संस्था यथोचितरीत्या घटित झाल्यानंतर तसेच पाणी वापर संस्था आणि, यथास्थिति, कालवा अधिकारी यांच्यामध्ये करार करण्यात आल्यानंतर, तो करार करण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत उक्त करारान्वये, कालवा व्यवस्थेची संयुक्त तपासणी करण्यात येईल. कार्यकारी अभियंता किंवा त्याचा प्रतिनिधी आणि पाणी वापर संस्थेचे पदाधिकारी.मिळून पाणी वापर संस्थेच्या लाभक्षेत्रातील संपूर्ण कालवा व्यवस्थेची संयुक्त तपासणी करतील आणि कालवा व्यवस्थेशी संबंधित कामांचे दोन स्वतंत्र सूच्यांमध्ये म्हणजेच प्राथम्य-एक आणि प्राथम्य-दोन, यांमध्ये वर्गीकरण करण्यात येईल.

(२) प्राथम्य-एक सूचीमध्ये, पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील पाण्याचा निर्देशित विसर्ग मंजूर करणे, पाण्यावर नियंत्रण व त्याचे मोजमाप, प्रवाही पद्धतीने सिंचन यासाठी सर्वथा आवश्यक असतील अशा अनिवार्य स्वरूपाच्या कामांचा अंतर्भाव असेल. प्राथम्य-दोन सूचीमध्ये, प्राथम्य-एक मध्ये नमूद केलेल्या कामांव्यतिरिक्त इतर कामे, जी पाणी वापर संस्थेचे कार्य कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील, परंतु जी प्राथम्य-एक ची कामे पूर्ण झाल्यानंतर हाती घेता येऊ शकतील अशा कामांचा अंतर्भाव असेल.

(३) संयुक्त तपासणीच्या निष्कर्षाची लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था व कालवा अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेल्या दोन प्रतींमध्ये नोंद ठेवण्यात येईल व प्रत्येकाकडे त्याची एक प्रत ठेवण्यात येईल.

(४) संयुक्त तपासणीच्या एका महिन्याच्या आत अशा संयुक्त तपासणीच्या निष्कर्षाच्या आधारे कालवा व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याकरिता म्हणून आणि समुचित प्राधिकरणाचे प्रचलित निदेश व आदेश यांना अनुसरून जी कामे पार पाडावयाची आहेत अशा कामांच्या बाबींची यादी, कालवा अधिकारी व पाणी वापर संस्था यांच्या सहमतीने तयार करण्यात येईल.

(५) पोट-कलम (४) खालील कामाच्या बाबींची अशी सूची तयार झाल्यावर, यासंबंधात यथोचितरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेला, कार्यकारी अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसणारा कालवा अधिकारी, पाणी वापर संस्थेस, कालवा व्यवस्थेमधील संपूर्ण लाभक्षेत्रामध्ये संकल्पित आणि विनिर्दिष्ट कालावधीमध्ये पाणी पोहोचवले जात आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी कोणतीही दुरुस्ती व नूतनीकरण आवश्यक असल्यास, ते पूर्ण करण्याचे वेळापत्रक कळवील. प्राथम्य-एक ची कामे वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण करण्याचा कालावधी_संबंधित पाणी वापर संस्थेच्या संमतीखेरीज, संयुक्त तपासणीच्या दिनांकापासून बारा महिन्यांपेक्षा अधिक वाढविण्यात येणार नाही. प्राथम्य-एक मधील कामे पूर्ण झाल्यानंतर, व्यवस्थेची चाचणी घेण्यात येईल आणि ती पाणी वापर संस्थेकडे सोपविण्यात येईल. अशा चाचणीच्या एका महिन्याच्या आत पाणी वापर संस्थेने ती व्यवस्था ताब्यात घेण्यास कसूर केल्यास, ती पाणी वापर संस्थेकडे सोपविली असल्याचे मानण्यात येईल. दुरुस्त्या व नूतनीकरणाच्या कामामध्ये पाणी वापर संस्थांचा सहभाग विहित केल्याप्रमाणे असेल. अशा प्रकारे व्यवस्था सुपूर्द करण्यात आल्यानंतर, प्राथम्य-दोन ची कामे जास्तीत जास्त अठरा महिन्यांच्या आत पूर्ण करण्यात येतील. अपवादात्मक परिस्थितीत हा कालावधी वाढविण्याचा अधिकार कालवा अधिकाऱ्याकडे असेल.

(६) अशा कामांच्या बाबींच्या सूचीला संयुक्त तपासणीच्या निष्कर्षांच्या प्रती, दुरुस्त्या व नूतनीकरणाची कामे पूर्ण करण्याचे संमत वेळापत्रक आणि दोन्ही पक्षांच्या सहमतीने ठरवलेल्या अशा दुरुस्तीच्या कामांची यादी हे सर्व जोडण्यात येईल.

(७) पोट-कलम (१) ला अनुसरून केलेल्या करारामध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबतीत, पाणी वापर संस्था आणि कालवा अधिकारी यांच्यात कोणताही विवाद उद्भवल्यास, त्यावर संबंधित अधीक्षक अभियंता निर्णय देईल व त्याचा त्या प्रकरणातील निर्णय अंतिम असेल.

२३. (१) या अधिनियमाखाली आराखडा निश्चित करण्यात आलेल्या प्रत्येक कार्यक्षेत्राच्या किंवा या अधिनियमाखाली प्रवाही सिंचनाकरिता यथोचितरीत्या पाणी वापर संस्था घटित करण्यात आली असेल अशा क्षेत्राच्या बाबतीत पाणी वापर संस्थेला, पाणीपुरवठ्याच्या जागी कालव्यावर योग्य मोजणी करणारे साधन किंवा साधने पुरविणे आणि ते योग्य प्रकारे काम करीत असल्याबाबत वेळोवेळी खात्री करून घेणे, हे संबंधित कालवा अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल. मोजणी यंत्र बसविणे.

(२) कालव्याच्या प्रवाहाची अचूक मोजणी, त्याची नोंद घ्यावयाचा नमुना आणि त्याचे नियतकालिक मूल्यमापन ; तसेच मोजणी यंत्र नादुरुस्त असेल अशा कालावधीसाठी पाण्याचे परिमाण मोजून घेण्याकरिता निश्चित पद्धती ही विहित केल्याप्रमाणे असेल.

२४. करारामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही निर्बंधाच्या अधीन राहून, पाणी वापर संस्थेला अनुज्ञेय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणात किंवा, यथास्थिति, देय पाण्याच्या प्रमाणात, वेगवेगळी पिके घेण्याचे स्वातंत्र्य असेल. पिके घेण्याचे स्वातंत्र्य.

२५. (१) सिंचन पद्धतीचे शेतकऱ्याकडून व्यवस्थापन या खालील क्षेत्रातील पाणी वापर संस्थेला सिंचनासाठी स्वतःच्या खर्चाने पाण्याचा पुनर्वापर करण्याचे स्वातंत्र्य असेल : सिंचनाच्या पाण्याचा पुनर्वापर करण्याचे आणि भूजलाचा वापर करण्याचे स्वातंत्र्य.

परंतु, अशाप्रकारे पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी समुचित प्राधिकरणाला कोणताही जादा आकार द्यावा लागणार नाही.

(२) पाणी वापर संस्थांना, कालव्याच्या पाण्याबरोबरच किंवा अन्यथा त्यांच्या लाभक्षेत्रातील भूजलाचा, विहित रीतीने वापर करण्याचे स्वातंत्र्य असेल :

परंतु, भूजलाचा वापर केल्याबद्दल समुचित प्राधिकरणाला कोणताही जादा आकार द्यावा लागणार नाही.

(३) प्रकल्पामधील आणि नदीच्या पात्रातील पाण्याचा समन्यायी पुरवठा करण्याची सुनिश्चिती करण्याच्या आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने,
१९७६ समुचित प्राधिकरणास, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या कलम १९,
चा महा. २० व २१ मधील तरतुदींचा उपयोग करून घेऊन विनिर्दिष्ट सीमांच्या आत
३८. जलनिस्सारणाला अवरोध करण्यास मनाई करता येईल.

२६. (१) कालवा अधिकाऱ्याकडून किंवा, यथास्थिति, पाणी वापर संस्थांच्या उच्चस्तरीय संस्थेकडून पाणी वापर संस्थाना, त्यांच्या हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार कालवा व्यवस्थेकडून सोडलेल्या पाण्याचा, वेगवेगळ्या स्तरावर, शेवट ते सुरुवात (Tail to Head) व एकत्रित घनमापन तत्त्वावर पुरवठा करण्यात येईल. पाणी वापर संस्थेला पाणी-पुरवठा करण्याची पद्धती व पाण्याचा दर.

(२) पाणी वापर संस्थेला करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यावरील पाणीपट्टी, पुरवठ्याच्या जागी मोजलेल्या पाण्याच्या घनमापनावर आकारण्यात येईल.

(३) जर पाणी वापर संस्थेने एखाद्या हंगामात सिंचनासाठी अनुज्ञेय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार पाण्याची मागणी किंवा वापर केला नाही तरी, समुचित प्राधिकरणाला, पाणी वापर संस्थेवर विहित केल्यानुसार किमान आकार बसविण्याचा अधिकार असेल.

(४) पोट-कलम (२) खाली पाणी पुरवण्याकरिता आणि पोट-कलम (३) खाली किमान पाणीपट्टी या करितांचे दर विहित करण्यात येतील असे असतील.

सदस्यांना केलेल्या पाणीपुरवठ्यावर दर आकारण्याचा पाणी वापर संस्थेचा अधिकार.

२७. (१) पाणी वापर संस्थेला आपल्या सदस्यांकडून, पाणी वापर संस्थेचे सर्वसदस्य मंडळ मान्य करील असा पाण्याचा दर आकारण्याचा अधिकार असेल व ती त्यांची जबाबदारी असेल.

(२) पाणी वापर संस्थेला, आपल्या सदस्यांकडून ज्या जमिनीवरील सिंचनाकरिता पाण्याची मागणी किंवा वापर करण्यात आला नसेल अशा जमिनीच्या बाबतीत किमान पाणीपट्टी बसविण्याचा अधिकार असेल :

परंतु, जर हक्काच्या मंजूर प्रमाणानुसार पाणी उपलब्ध नसेल तर, अशी पाणीपट्टी बसविण्यात येणार नाही.

(३) पाणी वापर संस्थेला आपल्या सदस्यांवर पुनर्वापर केलेल्या पाण्याच्या किंवा भूजलाच्या वापरासाठी पाणीपट्टी बसविण्याचा अधिकार असेल.

(४) पाणी वापर संस्थेला, आपल्या सदस्यांकडून मागील थकबाकी विहित रीतीने वसूल करण्याचा हक्क असेल.

हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार पाणीपुरवठा.

२८. (१) पाणी वापर संस्थांना देय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार घनमापन पद्धतीने विहित रीतीने पाणीपुरवठा करणे ही, समुचित प्राधिकरणाची जबाबदारी असेल.

(२) आपल्या कार्यक्षेत्रात प्रत्येक सदस्याला अनुज्ञेय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार समन्यायी पद्धतीने पाणीपुरवठा करणे ही, संस्थेची जबाबदारी असेल.

कराराचा मसुदा.

२९. (१) सिंचन पद्धतीने शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन योजनेखालील क्षेत्रातील कोणत्याही स्तरावरील पाणी वापर संस्थेला सिंचनासाठी केला जाणारा पाणीपुरवठा हा पाणी वापर संस्थेची अध्यक्ष आणि उच्चस्तरीय संस्थेची अध्यक्ष किंवा, यथास्थिति, याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेला कालवा अधिकारी यांनी स्वाक्षरित करावयाच्या करारानुसार होईल. या करारनाम्याची जलसंपदा विभागाकडे विहित केल्यानुसार नोंद ठेवण्यात येईल.

(२) या करारात इतर गोष्टींबरोबरच, पुढील बाबींकरिता तरतुदींचा अंतर्भाव असेल :—

(एक) कराराची उद्दिष्टे ;

(दोन) पाणी वापराचे हक्क ;

(तीन) घनमापन पद्धतीने पाण्याचे दर व पाणीपट्टी आकारणी ;

(चार) पाणी वापर संस्थेच्या सदस्यांचे हक्क ;

(पाच) पाणी वापर संस्थेचे हक्क ;

(सहा) पाणीपट्टी वसुली ;

(सात) मागील थकबाकी ;

(आठ) कालवा व्यवस्थेचे परिरक्षण व दुरुस्ती ;

(नऊ) शेतचाऱ्या व शेतचर यांचे परिरक्षण व दुरुस्ती ;

(दहा) समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेली विशेष प्रोत्साहने, कोणतीही असल्यास ;

(अकरा) विवाद सोडविणे ;

(बारा) कराराची मुदत ;

(तेरा) कराराची समाप्ती किंवा पुनरीक्षण ;

(चौदा) संयुक्त तपासणी, पुनरुज्जीवन, उर्वरित काम पूर्ण करण्याचे आणि हस्तांतरण करण्याचे वेळापत्रक इत्यादी ;

(पंधरा) भरपाई ;

(सोळा) दंड ;

(सतरा) तांत्रिक मार्गदर्शन व प्रशिक्षण ;

(अठरा) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, अधिनियमान्वये करारामध्ये तरतूद करावयाच्या विहित केल्याप्रमाणे अशा इतर सर्व बाबी.

**३०.** पाणी वापर संस्थेस कार्ये पार पाडण्यासाठी आणि या अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, पाणी वापर संस्थेचे पदाधिकारी आणि अशा पदाधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांखाली काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला विहित करण्यात येतील असे अधिकार असतील. पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी व त्यांचे अधिकार.

**३१.** पाणी वापर संस्थेला, तिच्या कार्यक्षेत्रातील कालवा व्यवस्थेला लागून असलेल्या मालमत्तेवरील अतिक्रमणे, विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार दूर करता येतील. अतिक्रमण दूर करण्याचा अधिकार.

**३२.** (१) पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या कोणत्याही स्तरावरील संचालकास संबंधित व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षाकडे नोंदणीकृत डाकेने पत्र पाठवून किंवा ते प्रत्यक्ष देऊन, आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. राजीनामा.

(२) पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या कोणत्याही स्तरावरील अध्यक्ष तिच्या लगत वरील संबंधित उच्चस्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांकडे पत्र पाठवून किंवा ते प्रत्यक्ष देऊन आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकेल :

परंतु, प्रकल्पस्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष संबंधित कालवा अधिकाऱ्याकडे नोंदणीकृत डाकेने पत्र पाठवून किंवा ते प्रत्यक्ष देऊन, त्याच्या पदाचा राजीनामा देईल.

**स्पष्टीकरण.**—कोणत्याही स्तरावरील उच्चस्तरीय संस्थेची व्यवस्थापन समिती अस्तित्वात नसेल अशा प्रकरणात, व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष आपला राजीनामा, तिच्या वरील उच्चस्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांकडे किंवा, यथास्थिति, संबंधित कालवा अधिकाऱ्याकडे नोंदणीकृत डाकेने पाठवील किंवा प्रत्यक्ष देईल.

(३) पोट-कलम (१) व (२) खाली प्राप्त झालेली राजीनामा पत्रे स्वीकारण्यासाठी किंवा नाकारण्यासाठी संबंधित पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीकडे त्वरित पाठविण्यात येतील आणि अशा राजीनाम्याची एक प्रत संबंधित कालवा अधिकाऱ्यांकडेसुद्धा पाठविण्यात येईल.

(४) असा प्रत्येक राजीनामा संबंधित व्यवस्थापन समितीने तो स्वीकारल्याच्या दिनांकापासून किंवा संबंधित व्यवस्थापन समितीला तो प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यावर, यांपैकी जे आधी घडेल तेव्हापासून परिणामक होईल.

अनर्हता. **३३.** (१) भारत सरकार किंवा कोणतेही राज्य शासन किंवा त्याचे स्थानिक प्राधिकरण किंवा शासनाच्या निधीतून सहाय्य मिळविणाऱ्या कोणत्याही संस्थेचा कोणताही कर्मचारी, निवडणुकीकरिता किंवा पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीची अध्यक्ष किंवा संचालक असल्यास किंवा असा अध्यक्ष किंवा संचालक पदावर राहण्याकरिता अनर्ह ठरेल.

(२) नैतिक अध:पाताचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही अपराधाकरिता फौजदारी न्यायालयाने सिद्धापराध ठरवलेली कोणतीही व्यक्ती, निवडणुकीसाठी किंवा पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष किंवा संचालक असल्यास किंवा असा अध्यक्ष किंवा संचालक म्हणून पदावर राहण्यासाठी अपात्र ठरेल.

(३) व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष किंवा संचालक या पदाकरिता निवडणुकीसाठीच्या नामनिर्देशनांच्या छाननीकरिता निश्चित केलेल्या दिनांकास किंवा नामनिर्देशनाच्या दिनांकास, एखादी व्यक्ती जर,—

(क) विकल मनाची असेल आणि सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले असेल ;

(ख) अमुक्त नादार असेल ;

(ग) एकतर शासनाला किंवा पाणी वापर संस्थेला देय असलेला जमीन महसूल किंवा पाणी कर किंवा पाणीपट्टी भरण्यास तिने कसूर केली असेल ;

(घ) नगरपरिषद, महानगरपालिका, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद किंवा कोणतेही राज्य शासन किंवा केंद्र सरकार किंवा पाणी वापर संस्था यांच्या बरोबर करण्यात आलेल्या विद्यमान संविदेमध्ये किंवा त्यांच्यासाठी करण्यात येत असेल अशा कोणत्याही कामांमध्ये तिचा हितसंबंध असेल ;

तर, ती, पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष म्हणून किंवा संचालक म्हणून निवडून येण्यास अपात्र ठरेल :

परंतु,

(एक) संचालक म्हणून नव्हे पण केवळ भागधारक म्हणून कंपनीमध्ये ; किंवा

(दोन) स्थावर मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्यामध्ये तिची विक्री खरेदी करण्यामध्ये किंवा तिच्यासाठी करण्यात आलेल्या कोणत्याही करारामध्ये ; किंवा

(तीन) कर्जाऊ रकमेच्या कोणत्याही करारामध्ये किंवा केवळ रकमेच्या प्रदानाकरिता द्यावयाच्या कोणत्याही प्रतिभूतीमध्ये ; किंवा

(चार) पाणी वापर संस्थेच्या कार्याची जाहिरात देण्यात आली असेल अशा कोणत्याही वृत्तपत्रामध्ये,

—हिस्सा किंवा हितसंबंध आहे, एवढ्याच केवळ कारणास्तव एखाद्या व्यक्तीचा अशा संविदेमध्ये किंवा कामामध्ये कोणताही हितसंबंध असल्याचे मानण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनाकरिता, एखादी संविदा संपूर्णपणे कार्यान्वित झाली असेल तेव्हा, नगरपरिषद, किंवा महानगरपालिका किंवा पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद किंवा पाणी वापर संस्था किंवा राज्य शासन किंवा केंद्र सरकार यांनी संविदात्मक आबंधनांचा त्याचा भाग कार्यान्वित केलेला नाही एवढ्याच केवळ कारणांवरून, ती विद्यमान संविदा असल्याचे मानण्यात येणार नाही.

(४) व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष किंवा संचालक जर वाजवी कारणाशिवाय व पूर्वसूचनेशिवाय व्यवस्थापन समितीच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिला तर, तो, पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदाच्या किंवा संचालकाच्या निवडणुकीकरिता किंवा त्या पदावर कायम राहण्याकरता अपात्र ठरेल.

(५) निवडणूक लढविण्याच्या वेळेस दोनपेक्षा अधिक अपत्ये असतील अशा व्यक्तीला, व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष किंवा संचालक म्हणून निवडणूक लढविण्यासाठी अनर्ह ठरविण्यात येईल :

परंतु, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकाला दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेली व्यक्ती, अशा दिनांकाला त्याला असलेल्या अपत्यांची संख्या वाढलेली नसेल तर, या पोट-कलमाखाली अनर्ह ठरणार नाही :

परंतु आणखी असे की, अशा दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत एका प्रसुतीत एका अपत्याचा किंवा एकापेक्षा अधिक अपत्यांचे झालेले जन्म, या कलमाखालील अनर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतले जाणार नाहीत.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता,—

(एक) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास किंवा त्यानंतर एखाद्या दांपत्याला केवळ एकच अपत्य असेल तर नंतरच्या प्रसुतीमध्ये एकाच वेळी कितीही अपत्ये जन्मली तरी, ते एकच अपत्य असल्याचे मानण्यात येईल.

(दोन) "अपत्य" यात, दत्तक अपत्याचा किंवा अपत्यांचा समावेश असणार नाही.

(६) एखादी व्यक्ती संबंधित पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील जमीन मालक किंवा भोगवटादार असण्याचे बंद झाल्यास, ती व्यक्ती पाणी वापर संस्थेचा सदस्य म्हणून राहण्यास किंवा पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष किंवा संचालकाचे पद धारण करण्यास अनर्ह ठरेल.

**३४.** (१) कलम १९ खाली सदस्याला माघारी बोलाविणे किंवा कलम ३३ खालील अनर्हतेमुळे किंवा मृत्यूमुळे किंवा राजीनाम्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे रिक्त झालेले पद, नामनिर्देशनाद्वारे, विहित करण्यात येईल अशा रीतीने भरण्यात येईल. रिक्त पदे भरणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये नामनिर्देशित केलेल्या पाणी वापर संस्थेच्या संचालकांच्या किंवा अध्यक्षांच्या पदाची मुदत, व्यवस्थापन समितीच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.

अभिलेख. **३५.** (१) प्रत्येक पाणी वापर संस्था आपल्या कार्यालयात पुढील लेखापुस्तके व अभिलेख ठेवील :—

(क) सदस्यांची नावे, पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रात त्यांनी धारण केलेली जमीन आणि सर्वसाधारण वर्षामधील त्यांच्या पाणी वापराच्या हक्काचे प्रमाण, यांचा अंतर्भाव असलेल्या, पाणी वापर संस्थेच्या सदस्यांचे नोंदणी पुस्तक ;

(ख) यथोचित अद्ययावत फेरबदल केलेली या अधिनियमाची एक प्रत ;

(ग) शासनाच्या जलसंपदा विभागाशी विचारविनिमय करून तयार करण्यात आलेल्या कालवा व्यवस्थेच्या संरचनेच्या नकाशासह पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्राचा नकाशा ;

(घ) मत्ता व दायित्वे यांचे विवरण ;

(ङ) सर्वसदस्य बैठकीच्या कामकाजांचे नोंदणी पुस्तक ;

(च) व्यवस्थापन समितीच्या बैठकींच्या कामकाजाचे नोंदणी पुस्तक ;

(छ) व्यवस्थापन समिती संचालकांच्या निवडणुकीच्या आणि माघारी बोलाविण्याच्या कामकाजाचे नोंदणी पुस्तक ;

(ज) जमा व खर्च दाखविणारी लेखा पुस्तके ;

(झ) पाणी वापर संस्थेकडून करण्यात आलेल्या मालांच्या सर्व खरेदीची व विक्रीची लेखा पुस्तके ;

(ञ) मोजमापे ठेवणारी पुस्तके, पाण्याची पातळी दर्शविणारी पुस्तके, कामाचे आदेश आणि यांसारखी नोंदणी पुस्तके ;

(ट) लेखापरीक्षा अहवाल आणि चौकशी अहवाल यांच्या प्रती ;

(ठ) पाण्याचा हिशेब ; आणि

(ड) विहित करण्यात येतील असे इतर सर्व लेखे, अभिलेख व दस्तऐवज.

(२) पाणी वापर संस्थेकडून ठेवण्यात येणारी लेखा-पुस्तके व इतर अभिलेख, याबाबतीत तयार करण्यात घेणाऱ्या नियमांच्या अधीन राहून, अशा संस्थेच्या सदस्यांच्या माहितीसाठी खुले ठेवण्यात येतील.

नमुना विनियम. **३६.** (१) राज्य शासन, आयोजित करावयाच्या बैठकींची संख्या, बैठकीची कार्यपद्धती आणि गणपूर्ती, इत्यादी संबंधीची मार्गदर्शक तत्त्वे घालून देणारे नमुना विनियम, पाणी वापर संस्था आणि तिची व्यवस्थापन समिती यांच्या मार्गदर्शनासाठी आणि त्यांनी त्याचा अंगीकार करावा यासाठी, प्रकाशित करील.

(२) पाणी वापर संस्था, विनियमात फेरबदल करणे आवश्यक असल्यास, नमुना विनियमांचे स्वरूप आणि प्रयोजन पूर्णपणे निष्फळ न करणारे फेरबदल, असे फेरबदल आवश्यक करणारी कारणे नमूद करून, या नमुना विनियमांचा अंगीकार करील.

पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे विसर्जन आणि संक्रमणकालातील व्यवस्था. **३७.** (१) पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीने अधिकारांचा कोणताही गैरवापर केला असेल व आपली कामे पार पाडण्यात कसूर केली असेल किंवा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केले असेल अशा बाबतीत, कसूरदार समितीस कारणे दाखविण्याची पुरेशी संधी दिल्यानंतर संबंधित समुचित प्राधिकाऱ्याला व्यवस्थापन समितीचे विसर्जन करता येईल किंवा आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील :

परंतु, असे विसर्जन झाल्यावर, व्यवस्थापन समिती, विसर्जनाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, पुनर्घटित करण्यात येईल.

(२) राज्य शासनाला, अशी व्यवस्थापन समिती घटित होईपर्यंत अशा व्यवस्थापन समितीचे अधिकार बजाविण्यासाठी व कार्ये पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विहित केल्याप्रमाणे पदनिर्देशित करता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये असे पुनर्घटन झाल्यानंतरही, पाणी वापर संस्था कार्य करीत नसेल तर, समुचित प्राधिकरण, अशा संस्थेच्या व्यवस्थापन समितीला, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, विहित केल्याप्रमाणे आवश्यक अशी कार्यवाही करील.

**३८.** (१) समुचित प्राधिकरणाला, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, कोणत्याही पाणी वापर संस्थेसाठी, सक्षम प्राधिकारी म्हणून, त्याला योग्य वाटतील इतक्या संख्येने, राज्य शासनाच्या जलसंपदा विभागातील अधिकारी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियुक्त किंवा पदनिर्देशित करता येतील. सक्षम प्राधिकाऱ्याची नियुक्ती.

(२) पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेला असा सक्षम प्राधिकारी, तांत्रिक सल्ला देईल आणि तांत्रिक मानकानुसार काम चाललेले आहे याची सुनिश्चिती करील.

## प्रकरण तीन

## उपसा सिंचन पाणी वापर संस्था

**३९.** (१) या अधिनियमाखालील प्रत्येक उपसा सिंचन योजनेसाठी, पाणी वापर संस्था स्थापन करण्यात येईल. उपसा सिंचनासाठी पाणी वापर संस्था.

(२) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आधीचा नसेल असा दिनांक, समाप्तीचा दिनांक म्हणून घोषित करेल व त्यानंतर, आराखडा करण्यात आलेल्या क्षेत्रातील उपसा सिंचनाच्या सर्व व्यक्तिगत योजनांना मिळालेली मंजुरी रद्द होईल :

परंतु, राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे उक्त कालावधी वाढविता येईल :

परंतु आणखी असे की काही अपवादात्मक परिस्थिती व भौगोलिक कारणांमुळे उपसा सिंचन संस्था स्थापन होईपर्यंत व्यक्तीगत उपशाची परवानगी चालू राहील.

**४०.** प्रवाही आणि उपसा पद्धतीच्या सिंचनाचे लाभक्षेत्र परस्परव्याप्त होऊन त्याद्वारे उद्‌भवणारी गुंतागुंत टाळण्यासाठी समुचित प्राधिकरणास, प्रवाही आणि उपसा सिंचनाच्या क्षेत्राचा विहित करण्यात येईल अशा रीतीने, स्वतंत्रपणे आराखडा तयार केल्यानंतर प्रवाही सिंचनाच्या लाभक्षेत्रात अधिसूचित नद्यांवर किंवा नाल्यांवर उपसा सिंचन पाणी वापर संस्था स्थापन करण्यास परवानगी देता येईल. प्रवाही सिंचनाच्या लाभक्षेत्रात अधिसूचित नद्यांवर किंवा नाल्यांवर उपसा सिंचन पाणी वापर संस्था स्थापन करण्यास परवानगी.

अधिसूचित नद्यांवर किंवा नाल्यांवर, उपसा सिंचन पाणी वापर संस्थांच्या जलाशयावरील कार्यक्षेत्राच्या पलिकडे जलाशयाच्या वरच्या बाजूला व्यक्तिगत उपशाला परवानगी.

**४१.** अधिसूचित नद्यांवर किंवा नाल्यांवर, उपसा सिंचन पाणी वापर संस्थांच्या जलाशयावरील कार्यक्षेत्राच्या पलिकडे, जलाशयाच्या सभोवतालच्या भागात व विहित केलेल्या पाणी वापराच्या मर्यादेपर्यंत सर्व संबंधित प्रकल्पग्रस्तांना विहित केल्याप्रमाणे, वरच्या बाजूला उपसा सिंचन करण्याच्या बाबतीत, समुचित प्राधिकरणाद्वारे त्याबाबतीत यथोचितरित्या प्राधिकृत करण्यात येईल अशा कालवा अधिकाऱ्याला व्यक्तिगत उपसा करण्यास परवानगी देता येईल व त्यावर नियंत्रण ठेवता येईल :

परंतु, उपसा सिंचन पाणी वापर संस्था स्थापन झाल्यावर, कालवा अधिकारी, या कलमाखाली व्यक्तिगत उपशासाठी दिलेली मंजुरी रद्द करील :

परंतु आणखी असे की, जलाशयावरील उपसा सिंचनाकरिता द्यावयाच्या पाण्याची मर्यादा भौगोलिक परिस्थिती व पाण्याच्या उपलब्धतेनुसार विहित केल्याप्रमाणे ठरविण्यात येईल.

उपसा सिंचन पाणी वापर संस्थांचे कार्यक्षेत्र निश्चित करणे.

**४२.** (१) समुचित प्राधिकरणाद्वारे या संदर्भात यथोचितरित्या अधिकार प्रदान करण्यात आलेला, कार्यकारी अभियंता या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कालवा अधिकारी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि या अधिनियमाखाली केलेल्या नियमांना अनुसरून, उपसा सिंचन पाणी वापर संस्थांच्या लाभक्षेत्रांचे स्वतंत्रपणे विहित मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित सीमांकन करील आणि ती क्षेत्रे, या अधिनियमाचा प्रयोजनासाठी संबंधित उपसा सिंचन पाणी वापर संस्थांची कार्यक्षेत्रे म्हणून घोषित करील.

(२) उपसा सिंचन पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्राचा आराखडा तयार करण्याबाबत, कलम ६ ची पोट-कलमे (२), (३), (४), (५) व (६) यांच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

उपसा सिंचन पाणी वापर संस्था घटित करणे.

**४३.** (१) कलम ४२ अन्वये उपसा सिंचन पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र म्हणून आराखडा काढलेल्या क्षेत्रांमध्ये, अशाप्रकारे आराखडा काढलेल्या जमिनीच्या धारकांकडून किंवा भोगवटादारांकडून उपसा सिंचन पाणी वापर संस्था घटित करण्यात येतील. अशा संस्था विहित रीतीने नोंदणीकृत करण्यात येतील.

(२) उपसा सिंचन पाणी वापर संस्था घटित करण्याच्या बाबतीत, कलम ८ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(३) राज्य शासनास, कारणे लेखी नमूद करून, अन्य कोणत्याही प्रकारच्या किंवा स्वरूपाची उपसा सिंचन पाणी वापर संस्थेची तरतूद करता येईल.

उपसा सिंचन पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती आणि तिच्या संचालकांची व अध्यक्षांची निवडणूक.

**४४.** उपसा सिंचन पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती आणि तिच्या अध्यक्ष व संचालकांची निवडणूक यांना, कलम ९ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

४५. उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना पाणीपुरवठा करणे, तसेच राज्यात व्यक्तिगत उपसा करावयाचा असल्यास, त्या बाबी, या बाबतीत समुचित प्राधिकरणाकडून यथोचितरित्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याकडून नियंत्रित व विनियमित करण्यात येतील. नदीच्या पात्रात पंप बसविण्यासाठी कालवा अधिकारी परवानगी मिळवून देण्यासाठी मदत करील : सर्व उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना करावयाचा पाणीपुरवठा तसेच व्यक्तिगत उपसा या बाबी, कालवा अधिकाऱ्याने विनियमित करणे.

परंतु, मुख्य कालवा स्तरावर उपसा सिंचन पाणी वापर संस्था स्थापन करण्यामध्ये कोणतीही अडचण असेल तर, समुचित प्राधिकरणास, त्याच्या व्यवहार्यतेचा अभ्यास केल्यावर, मुख्य कालव्याच्या लाभक्षेत्राबाहेर व्यक्तिगत उपसा करण्याची जबाबदारी, विनिर्दिष्ट कालावधीसाठी, जवळच्या लघुवितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेकडे, आदेशाद्वारे, सुपूर्द करता येईल :

परंतु, आणखी असे की, त्यासाठी संबंधित पाणी वापर संस्था आणि संबंधित भूधारक किंवा भोगवटादार यांची, अशा सुपूर्दगीसाठी संमती मिळवावी लागेल.

४६. उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना मुख्य कालव्यातून पाण्याचा थेट उपसा करता येणार नाही. उपसा सिंचन पाणी वापर संस्थांनी स्वतःच्या खर्चाने बांधलेल्या अंतर्ग्रहण विहिरीत गोळा करून, ते पाणी तेथून योजना करून प्रवाही पद्धतीने त्या उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना उपलब्ध करून देण्यात येईल : उपसा सिंचन पाणी वापर संस्थांनी मुख्य कालव्यातून पाण्याचा थेट उपसा न करणे.

परंतु, अस्तित्वात असलेल्या वैयक्तिक उपसा सिंचन योजनांकरिता, तसेच कलम ३९ नुसार उपसा सिंचन पाणी वापर संस्थांची नोंदणी झाल्यानंतरही, या संस्थेमध्ये समावेश झालेल्या व्यक्तिगत उपसा सिंचन योजनांना अंतर्ग्रहण विहिरी बांधण्याची अट शिथील करण्यात येईल.

४७. (१) उपसा सिंचन पाणी वापर संस्था, प्रवाहाचे मोजमाप करण्यासाठी भारतीय मानक ब्युरोद्वारे (आयएसआय) प्रमाणित जलमापकांची (Water meters) स्वतःच्या खर्चाने तरतूद करतील, ते बसवतील, त्यांची देखभाल करतील व त्यांचे अंशमापन (Calibrate) करतील : उपसा सिंचन पाणी वापर संस्थांनी जलमापकाची तरतूद करणे व त्यांचे परिरक्षण करणे.

परंतु, पाण्याचा उपसा करण्याच्या प्रत्येक साधनासाठी स्वतंत्र जलमापक असेल.

(२) या बाबतीत यथोचितरित्या अधिकार प्रदान केलेल्या कालवा अधिकाऱ्यास, जलमापकांची तपासणी व चाचणी करण्याचा आणि त्यास योग्य वाटेल असा आदेश देण्याचा अधिकार असेल.

४८. समुचित प्राधिकरणास, उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना आणि व्यक्तिगत उपशासाठी करावयाच्या वीज पुरवठ्याचे नियंत्रण व विनियमन करण्यासाठी विहित केल्यानुसार स्वतंत्र व्यवस्था करता येईल. महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ च्या कलम ९७ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह, या अधिनियमाखालील उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना लागू होतील. उपसा सिंचन योजनांसाठी विद्युत पुरवठा करण्याकरिता कालवा अधिकारी मदत करेल. उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना करावयाच्या वीज पुरवठ्याचे विनियमन.

१९७६ चा महा. ३८.

उपसा सिंचन पाणी वापर संस्थेसाठी पाण्याचा दर निश्चित करणे.

**४९.** उपसा सिंचन पाणी वापर संस्थांनी, उपसा सिंचन योजना स्थापित करण्यावरील आणि तिची रचना व परिरक्षण करण्यावरील सर्व खर्च सोसला आहे, ही वस्तुस्थिती विचारात घेऊन समुचित प्राधिकरण, या संदर्भात करण्यात आलेल्या नियमांना अनुसरून, उपसा सिंचन पाणी वापर संस्थांसाठी घनमापन पद्धतीने स्वतंत्र पाण्याचा दर निश्चित करील.

पाणी वापर संस्थांच्या तरतुदी लागू करणे.

**५०.** या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल, त्याव्यतिरिक्त, पाणी वापर संस्थेसाठी केलेल्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना लागू होतील.

उपसा सिंचन पाणी वापर संस्थेची उच्चस्तरीय संस्थेशी संलग्नता.

**५१.** (१) मुख्य कालव्यावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्था या कालवा-स्तरीय पाणी वापर संस्थेचा सदस्य असल्याचे मानण्यात येईल.

(२) जलाशयावर आधारित उपसा सिंचन पाणी वापर संस्था ही प्रकल्पस्तरीय संस्थेची सदस्य असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण चार

## पाणी वापर संस्थेचे अधिकार व कर्तव्ये

पाणी वापर संस्थेचे अधिकार व कर्तव्ये.

**५२.** (१) कोणत्याही स्तरावरील पाणी वापर संस्था पुढील कामे पार पाडील :—

(क) उच्चस्तरीय संस्थेकडून किंवा यथास्थिति, संबंधित कालवा अधिकाऱ्यांकडून पुढील माहिती मागविणे व तिचा अभिलेख ठेवणे आणि ती, तिच्या सदस्यांकडे पोहचविणे :—

(एक) अशा संस्थेचे आणि तिच्या सदस्यांचे अनुज्ञेय हक्काच्या पाण्याचे प्रमाण ;

(दोन) निश्चित केलेल्या आवर्तनांची संख्या ;

(तीन) निश्चित केलेले सिंचन मध्यंतर ;

(ख) विहित निकषांवर आधारलेले, सदस्यांचे पाण्यासाठी केलेले अर्ज किंवा पाण्यासाठी केलेली मागणीपत्रे गोळा करणे, तपासणे आणि अंशतः किंवा पूर्णतः एकतर मंजूर करणे किंवा फेटाळणे ; तसेच मागील थकबाकी दिल्याशिवाय पाणी न देणे ;

(ग) उच्चस्तरीय संस्थेकडून किंवा संबंधित कालवा अधिकाऱ्याकडून कालवा कार्यचालन वेळापत्रकासंबंधीची माहिती मागवणे, प्रत्येक आवर्तनाने पाणीपुरवठा करण्यापूर्वी सदस्य-पाणी वापर संस्थांकरिता तपशीलवार पाणी वाटप कार्यक्रम किंवा वाराबंदी कार्यक्रम करणे आणि प्रत्येक सदस्याला, आपल्या हक्कानुसार घनमापनानुसार पाणीपुरवठा करण्याची सुनिश्चिती करणे :

परंतु, केवळ एकच पाणी वापर संस्था असलेल्या लघु सिंचन प्रकल्पाच्या बाबतीत, पाणी वापर संस्था स्वतः प्रकल्पाकरिता कालवा कार्यचालन वेळापत्रक तयार करील ;

(घ) प्रत्येक सिंचन हंगाम सुरू होण्यापूर्वी सदस्यांना पुढील बाबतीत मार्गदर्शन व मदत करण्यासाठी व्यवस्थापन समितीची बैठक बोलावणे,—

(एक) कालवा कार्यचालन वेळापत्रक व पाणी वाटप कार्यक्रम ;

(दोन) जाहीर नोटीस काढणे ;

(तीन) हंगाम सुरू होण्यापूर्वी कालवा व्यवस्थेचे परिरक्षण करणे ;

(चार) उच्चस्तरीय संस्था व समुचित प्राधिकरण यांनी घेतलेल्या अद्ययावत निर्णयासंबंधीची माहिती.

(ङ) उच्चस्तरीय संस्थेकडून किंवा कालवा अधिकाऱ्याकडून हक्काच्या पाण्याचे प्रमाण प्राप्त करणे आणि शेवट ते सुरुवात या तत्त्वाचा काटेकोरपणे अवलंब करून सदस्यांना पाण्याच्या हक्कानुसार पाणीपुरवठा करणे ;

(च) आवर्तननिहाय किंवा हंगामनिहाय विहित नमुन्यात पाण्याचे हिशेब ठेवणे ;

(छ) सदस्यांना करावयाच्या पाण्याच्या वाटपाचे विनियमन व संनियंत्रण करणे ;

(ज) सदस्यांकडून देय असलेल्या पाणीपट्टीची आकारणी करणे आणि विहित नमुन्यात देयके पाठवणे आणि कालवा अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेले पाणी पुरवठ्याचे देयक विहित कालावधीत कालवा अधिकाऱ्याकडे अदा करणे ;

(झ) निम्नस्तरावरील पाणी वापर संस्थेकडून कार्यचालन व परिरक्षणाकरिता विहित सेवा आकार गोळा करणे आणि आपला हिस्सा, यथास्थिति, उच्चस्तरीय संस्थेकडे किंवा संबंधित कालवा अधिकाऱ्यांकडे भरणे ;

(ञ) त्यांच्या अधिकारितेखाली येणाऱ्या कालवा व्यवस्थेचे वार्षिक परिरक्षण व दुरुस्ती करणे ;

(ट) सदस्यांनी आपली कालवा व्यवस्था चांगल्या स्थितीत ठेवली आहे तसेच, संमत केलेली परिरक्षणाची रक्कम त्यांना वेळेत मिळते हे सुनिश्चित करणे ;

(ठ) विहित केल्याप्रमाणे अभिलेख ठेवणे ;

(ड) सदस्यांमधील विवाद असल्यास मिटवणे ;

(ढ) या अधिनियमाच्या प्रकरण पाचमध्ये उल्लेख केलेली साधनसंपत्ती उभारणे व तिचा वापर करणे ;

(ण) शेतीशी संबंधित सर्व संलग्न कामे हाती घेणे ;

(त) जल लेखापरीक्षण व तपासलेले हिशेब यांसह वार्षिक अहवाल तयार करणे व ते सर्वसदस्य मंडळाला सादर करणे ;

(थ) शासनास सिंचनस्थितीदर्शक अहवाल प्रतिवर्षी प्रसिद्ध करण्यासाठी लागणारी आवश्यक माहिती विहित केल्याप्रमाणे कालवा अधिकाऱ्यांना वेळेत पुरविणे ;

(द) पाणी वापर संस्थेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आवश्यक असतील अशी कोणतीही अन्य कामे हाती घेणे.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था आपल्या कार्यक्षेत्रात पुढील कामे पार पाडील :—

(क) पाण्याची उपलब्धता आणि हक्काच्या पाण्याचे प्रमाण यासंबंधीच्या उपलब्ध माहितीबद्दल चर्चा करण्यासाठी प्रत्येक सिंचन हंगामापूर्वी सदस्यांची बैठक बोलावणे आणि उपलब्ध पाण्याचे कार्यक्षमतेने व्यवस्थापन करण्यासाठी, त्यांच्या सूचना असल्यास, त्या मागवणे ;

(ख) सदस्यांकडून चालू पाणीपट्टी आणि आधीची थकबाकी, असल्यास, वसूल करणे ; व मागील थकबाकी दिल्याशिवाय त्यात/तीस पाणी वापर संस्थेचा सदस्य करू नये ;

(ग) ज्यांचे पाण्यासाठीचे अर्ज मंजूर झाले आहेत अशा सदस्यांना सिंचन परवाना देणे ;

(घ) उपलघुवितरिका, विमोचक यांकरिता आणि सदस्यांमधून त्यांच्या कार्यक्षेत्रात कालवा कार्यचालन वेळापत्रकांतर्गत पाणी वाटप कार्यक्रम किंवा वाराबंदी कार्यक्रम तयार करणे ;

(ङ) करारनाम्याची अंमलबजावणी करणे.

(३) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, पोट-कलम (१) च्या खंड (ज) अन्वये, आकारलेल्या पाणीपट्टीच्या देयकाची प्रत संबंधित कालवा अधिकाऱ्यांकडे पाठविणे, हे देखील पाणी वापर संस्थेचे कार्य असेल.

(४) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, बिगर सिंचन वापरासाठी अशा वापर संस्थांना कालवा अधिकाऱ्यांकडे भरणा करावयाच्या पाणीपट्टी आकारणीमध्ये कालवा अधिकाऱ्याला सहाय्य करणेदेखील प्रकल्पस्तरीय संस्थेचे काम असेल.

(५) प्रकल्पस्तरीय संस्था पोट-कलम (१) खालील कामांशिवाय, पुढील कामे पार पाडील :—

(क) प्रत्येक सिंचन हंगाम सुरू होण्यापूर्वी प्रकल्पांकरिता पाणी अंदाजपत्रक किंवा प्रारंभिक सिंचन कार्यक्रम तयार करणे आणि संबंधित कालवा अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून अनुज्ञेय हक्काच्या पाण्याचे प्रमाण, आवर्तनाची संख्या, सिंचन मध्यंतर निर्धारित करणे ;

(ख) जलाशयावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्थांसाठी आणि बिगर सिंचन वापरासाठी, अशा वापर संस्थांनी कालवा अधिकाऱ्याकडे भरणा करावयाच्या पाणीपट्टीच्या आकारणीमध्ये संबंधित कालवा अधिकाऱ्याला सहाय्य करणे ;

(ग) जलाशयाचे क्षेत्रफळ व पाणी धारण क्षमता यांचा तक्ता किंवा आलेख आणि कालवा वितरिकांच्या उत्सर्गाचा तक्ता प्राप्त करून त्याचा वापर करणे ;

(६) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, उपसा सिंचन पाणी वापर संस्था पुढील कामे पार पाडील :—

(क) अनुज्ञेय हक्काच्या पाण्याचे प्रमाण, आवर्तनाची संख्या आणि सिंचन मध्यंतर या गोष्टी विचारात घेऊन, एका हंगामात सिंचित करावयाच्या पिकांच्या व क्षेत्रांच्या बाबतीत सदस्यांना मार्गदर्शन करणे ;

(ख) संबंधित कालवा अधिकाऱ्याकडून पाणी मोजून घेणे व त्याचा सदस्यांना पुरवठा करणे.

(७) पाणी वापर संस्थेला त्यांच्या हक्काचा पाणी-कोटा देण्याकरिता, लाभक्षेत्रातील सदस्यांच्या सामायिक हिताकरिता सर्वसंबंधित सदस्यांच्या सहमतीने खाजगी संस्था किंवा कंपनीला अधिकचे कृषि उत्पन्न घेण्याकरिता विहीत केल्याप्रमाणे प्रतिवर्षी त्रिपक्षीय (पाणी वापर संस्था, कालवा अधिकारी व संबंधित खाजगी संस्था अथवा कंपनी) करार करता येईल.

५३. समुचित प्राधिकरणाची कार्ये व कालवा अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :— समुचित प्राधिकरणाची कार्ये व कालवा अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये.

(क) सर्व स्तरावरील पाणी वापर संस्थांच्या कार्यक्षेत्रांचा आराखडा निश्चित करणे आणि त्याबद्दल पाणी वापर संस्थांना माहिती पुरविणे ;

(ख) विहित केल्यानुसार सर्व स्तरावरील पाणी वापर संस्थांसाठी अनुज्ञेय हक्काच्या पाण्याचे प्रमाण निश्चित करणे व ते अधिसूचित करणे ;

(ग) तुटीच्या (deficit) वर्षात अनुज्ञेय हक्काच्या पाण्याचे प्रमाण काढण्याची पद्धत निश्चित करणे ;

(घ) सर्व स्तरावरील पाणी वापर संस्थांना, प्रत्येक वर्षाला, मान्य केलेल्या मध्यंतरानुसार घनमापनानुसार मोजलेल्या ठोक प्रमाणावर, अनुज्ञेय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार पाणीपुरवठा केला जातो याची सुनिश्चिती करणे ;

(ङ) पाणी वापर संस्थेकडे हस्तांतरण न केलेल्या कालवा व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करणे, आधुनिकीकरण करणे, परिरक्षण व कार्यचालन करणे ;

(च) संयुक्त तपासणी करणे आणि पाणी वापर संस्थेशी विचारविनिमय करून, विहित केल्याप्रमाणे दुरुस्ती व नुतनीकरणाच्या कामाची सुनिच्छिती करणे ;

(छ) पाणी वापर संस्थेशी करार करणे ;

(ज) एखादी कालवा व्यवस्था पाणी वापर संस्थेला हस्तांतरित करण्यापूर्वी, शेतकऱ्यांच्या सिंचन व्यवस्थापन पद्धती अन्वये आराखडा निश्चित केलेल्या क्षेत्रात तिचे पुनरुज्जीवन करणे ;

(झ) पाणी वापर संस्थेला आपली क्षमता विकसित करण्यासाठी, आवश्यक ते तांत्रिक व व्यवस्थापकीय सहाय्य पुरविणे ;

(ञ) पाणी वापर संस्थांना, पाण्याची उपलब्धता, कालवा कार्यचालन वेळापत्रक या संबंधीची सर्व माहिती तसेच सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन याखालील क्षेत्रातील पाणीपुरवठ्याचे कार्यचालन आणि व्यवस्थापन यांच्याशी संबंधित अन्य कोणतीही माहिती पुरविणे ;

(ट) पाणी वापर संस्थेला पुरविण्यात आलेल्या पाण्याचे देयक विहित केलेल्या पद्धतीप्रमाणे आकारणी करून देणे व त्याची वसुली करणे.

(ठ) कलम ५३ च्या तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता सुरूवातीला लघुवितरिका स्तरावरील (पाणी वापर संस्थेची प्राथमिक शाखा) पाणी वापर संस्था सक्षमपणे कार्यरत झाल्याची समुचित प्राधिकरणाची विहित केल्यानुसार खात्री झाल्यानंतरच यथास्थिती उच्चस्तरीय पाणी वापर संस्था गठित करणेबाबत संबंधित कालवा अधिकारी कलम १०, १३ व १६ नुसार कार्यवाही करेल.

(ड) पाणी वापर संस्थांची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी, विहित करता येतील अशी अन्य कोणतीही कामे पार पाडणे.

## प्रकरण पाच

## निधीची साधने

पाणी वापर संस्थेच्या निधीची साधने.

५४. पाणी वापर संस्थेचा निधी पुढील मार्गांनी उभारण्यात येईल :—

(एक) पाणीपट्टी ;

(दोन) ठेवींवरील व्याज ;

(तीन) सदस्यांकडून घेतलेली ठेव ;

(चार) कर्जे ;

(पाच) देणग्या ;

(सहा) सदस्यांनी केलेले अंशदान ;

(सात) अनुदान ;

(आठ) सदस्यांकडून घेतलेली दंडाची रक्कम व शिक्षार्थ शुल्क ;

(नऊ) दिलेल्या सेवेसाठी शुल्क.

पाणी वापर संस्थेच्या निधीचा वापर.

५५. पाणी वापर संस्थेचा निधी, पाणी वापर संस्थेची उद्दिष्टे विहित रीतीने पूर्ण करण्यासाठी वापरण्यात येईल.

अंदाजपत्रक.

५६. प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये, पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती, समितीच्या अंदाजित जमा रकमा आणि खर्च दर्शविणारे, पुढील वित्तीय वर्षासंबंधीचे अंदाजपत्रक तयार करील आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याच्या मान्यतेकरिता पाणी वापर संस्थेच्या सर्वसदस्य मंडळासमोर ठेवील.

**५७.** पाणी वापर संस्था आपला निधी अनुसूचित बँकेत (Scheduled Bank) किंवा सहकारी बँक किंवा नागरी बँक किंवा वाणिज्यिक बँक किंवा टपाल खाते बचत बँकेत ठेवील. निधी जमा करणे व निधीचा कारभार.

**५८.** प्रत्येक पाणी वापर संस्था, असा "राखीव निधी" ठेवील आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याचा वापर करील. राखीव निधी.

**५९.** प्रत्येक पाणी वापर संस्था, विहित करण्यात येईल अशा रीतीने दरवर्षी लेखापरीक्षण करून घेईल. लेखापरीक्षण.

## प्रकरण सहा

## अपराध आणि शिक्षा

**६०.** (१) जी कोणीही व्यक्ती, वैध कारण, मंजुरी किंवा प्राधिकार याशिवाय, पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रात पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेली कृत्ये करील, तिने या अधिनियमाखाली अपराध केला असल्याचे मामण्यात येईल आणि अपराधसिद्धीनंतर अशी व्यक्ती सहा महिन्यांपर्यंत असेल एवढ्या कारावासास आणि वार्षिक पाणीपट्टीच्या दहा पटीपर्यंतच्या द्रव्यदंडास किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र असेल. अपराध आणि शिक्षा.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कृती पुढीलप्रमाणे असतील :—

(क) कालवा व्यवस्थेचे नुकसान करणे किंवा त्यात फेरबदल करणे किंवा त्यात अडथळा आणणे ;

(ख) कालवा व्यवस्थेच्या प्रवाहात किंवा पाण्याच्या पातळीत हस्तक्षेप करील ;

(ग) दिलेल्या प्रयोजनांसाठी त्याची उपयुक्तता ज्याने कमी होईल अशा रीतीने किंवा ज्यामुळे एखाद्या प्रयोजनाकरिता त्याची योग्यता कमी होईल अशा रीतीने कालव्यातील पाणी प्रदूषित किंवा कलुषित करील ;

(घ) कालवा व्यवस्थेच्या कार्यचालन व परिरक्षणासाठी ठेवलेले कोणतेही उपकरण किंवा कोणत्याही उपकरणाचा भाग नष्ट करील, त्यात गैरफेर करील किंवा तो काढून टाकील ;

(ङ) सिंचनाच्या वेळापत्रकाच्या अंमलबजावणीमध्ये अडथळा आणील ;

(च) पाण्याचा अनधिकृतपणे वापर वा अपव्यय करील ;

(छ) पाण्याचा अनधिकृतपणे उपसा करील ;

(ज) कालवा व्यवस्थेच्या स्थैर्याला धोका निर्माण करील ;

(झ) जलनिःस्सारण व्यवस्थेच्या प्रवाहात अडथळा आणील ;

(ञ) कालवा व्यवस्थेच्या परिरक्षणाकडे दुर्लक्ष करील ;

(ट) कालवा व्यवस्थेचा वापर करण्यास प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस त्याचा कायदेशीर वापर करण्यास प्रतिबंध करील ;

(ठ) पाणीपट्टी वेळेवर भरणार नाही ;

(ड) या अधिनियमाच्या आणि त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील.

अपराध आपसात मिटविणे.

**६१.** (१) समुचित प्राधिकरणाला, एकतर या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेल्या नियमांखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधासाठी कार्यवाही सुरू करण्यापूर्वी, अशा अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून, एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम, आपसमेळाची रक्कम म्हणून, समुचित प्राधिकरण निर्धारित करील अशा वेळेत, स्वीकारता येईल.

(२) अशा व्यक्तीकडून आपसमेळाची रक्कम म्हणून, अशा रकमेचा भरणा केला गेल्यावर, अशी व्यक्ती कोठडीत असेल तर तिला मुक्त केले जाईल आणि या अधिनियमाखालील अपराधाच्या संबंधात अशा व्यक्तीविरुद्ध, कोणत्याही फौजदारी न्यायालयात कोणतीही कार्यवाही सुरू करण्यात आली असल्यास, तडजोडीची रक्कम आरोपमुक्ती रक्कम म्हणून मानण्यात येईल आणि अशा व्यक्तीविरुद्ध अशा अपराधाच्या बाबतीत आणखी कोणतीही फौजदारी कार्यवाही केली जाणार नाही.

इतर कायद्यांखाली शिक्षा करण्यास अटकाव नाही.

**६२.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही कृती किंवा अकृतीसाठी, त्याकाळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये, कोणत्याही व्यक्तीवर खटला चालविला जाण्यास किंवा तिला शिक्षा होण्यास प्रतिबंध होणार नाही :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस एकाच अपराधासाठी एकापेक्षा अधिक वेळा शिक्षा देण्यात येणार नाही.

## प्रकरण सात

## **वाद निवारण**

विवाद मिटविणे.

**६३.** (१) पाणी वापर संस्थेच्या सदस्यांमध्ये तिची रचना, व्यवस्थापन, अधिकार आणि कार्ये यांच्या संबंधित कोणताही विवाद किंवा मतभेद उद्‌भवल्यास, तो, संबंधित पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीकडून सोडवला जाईल.

(२) पाणी वापर संस्थेचा सदस्य आणि तिची व्यवस्थापन समिती यांच्यामध्ये, किंवा दोन किंवा अधिक पाणी वापर संस्थांमध्ये कोणताही विवाद किंवा मतभेद उद्‌भवल्यास, तो लगतनंतरच्या उच्चस्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीकडून सोडवला जाईल :

परंतु, प्रकल्पस्तरीय संस्थेचा सदस्य आणि तिची व्यवस्थापन समिती यांच्यामध्ये, किंवा दोन किंवा अधिक प्रकल्पस्तरीय संस्थांमध्ये कोणताही विवाद किंवा मतभेद उद्‌भवल्यास, असा विवाद, विहित केलेल्या अशा कालवा अधिकाऱ्याकडून सोडवला जाईल, ज्याचा निर्णय सर्व संबंधितांवर बंधनकारक असेल.

(३) पाणी वापर संस्था आणि सक्षम कालवा अधिकारी यांच्यामध्ये विवाद असेल तर, असा विवाद, यासाठी निहित केलेल्या अशा प्राधिकरणाकडे निर्देशित करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—कोणत्याही पातळीवरील उच्चस्तरीय संस्थेची व्यवस्थापन समिती अस्तित्वात नसेल अशा प्रकरणात, लगतनंतरच्या उच्चस्तरीय संस्थेची व्यवस्थापन समिती किंवा, यथास्थिति, संबंधित कालवा अधिकारी यांच्याकडून विवाद सोडविला जाईल.

(४) या कलमाखालील कोणताही विवाद किंवा मतभेद, तो निर्देशित केल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत निकालात काढला जाईल. पाणी वापराचे हक्क देण्याचे व वितरण संदर्भातील विवाद मिटविण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम २१ च्या तरतुदी लागू होतील व महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ मधील कलम ७५ नुसार नुकसान भरपाईबाबत निर्णय करण्यात येतील.

२००५ चा महा. १८. १९७६ चा महा ३८.

**६४.** (१) कोणत्याही स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीने दिलेला निर्णय किंवा संमत केलेला आदेश यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, लगतच्या उच्चस्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीकडे, त्याबाबत अपील करता येईल. अपील.

(२) प्रकल्पस्तरीय संस्थेच्या व्यवस्थापन समितीने दिलेला निर्णय किंवा संमत केलेला आदेश यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडे त्याबाबत अपील करता येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

(३) या कलमाखालील कोणतेही अपील, व्यथित पक्षकारास निर्णय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून किंवा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत करता येईल :

परंतु, समुचित प्राधिकरणास, पुरेशी कारणे लेखी नमूद करून तीस दिवसांनंतर दाखल केलेल्या अपिलास झालेल्या विलंबास सूट देता येईल.

(४) या कलमाखाली दाखल करण्यात आलेले प्रत्येक अपील हे, ते दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत निकालात काढले जाईल :

परंतु, विनिर्दिष्ट कालावधीत अपील निकालात काढण्यात येणार नाही अशा परिस्थितीत, अपील प्राधिकरण, तीस दिवसांपेक्षा अधिक झालेल्या विलंबाची कारणे लेखी नमूद करील.

**स्पष्टीकरण.**—लगतची उच्चस्तरीय संस्था अस्तित्वात नसेल अशा कोणत्याही पातळीवरील अपील हे, लगतनंतरच्या उच्चस्तरीय संस्थेकडे, किंवा, यथास्थिती, संबंधित कालवा अधिकाऱ्याकडे करता येईल.

## प्रकरण आठ

## **सर्वसाधारण तरतुदी**

**६५.** या अधिनियमाची व त्याखालील नियमांची अंमलबजावणी करताना महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम ११ ते १४ व कलम २२ यातील तरतुदी लागू असतील. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू करणे.

२००५ चा महा. १८.

विनिर्दिष्ट बाबींची व घटकांची मालकी व नियंत्रण राज्य शासनाकडे निहित असणे.

**६६.** शासनाने ठरविलेले असेल ते खेरीज करून एरव्ही, पुढील बाबींची मालकी व नियंत्रण शासनाकडे निहित असेल :—

(एक) कोणत्याही सिंचन प्रकल्पातील जलाशय आणि शीर्षकामे ;

(दोन) मुख्य नद्या आणि त्यांच्या उपनद्या ;

(तीन) शासकीय इमारती, वसाहती व जमिनी ;

(चार) शासकीय वाहने ;

(पाच) शासकीय दूरसंचार यंत्रणा :

परंतु, राज्य शासनास, त्या संदर्भात केलेल्या मागणीवरून, पाणी वापर संस्थांना, विहित आकार भरल्यावर खंड (तीन), (चार) व (पाच) मध्ये उल्लेखिलेल्या सुविधा विहित रीतीने वापरण्यास अनुमती देता येईल. पाणी वापर संस्थेने मागणी केल्यास, राज्य शासनास, आपल्या कर्मचाऱ्यांना पाणी वापर संस्थांमध्ये प्रतिनियुक्त करता येईल.

पाणी वापर संस्थेकडे सुपूर्द न केलेल्या कालवा व्यवस्थेचे नियंत्रण.

**६७.** (१) पाणी वापर संस्थेकडे सुपूर्द केलेली कालवा व्यवस्था वगळून इतर प्रत्येक कालवा व्यवस्था राज्य शासनाकडून नियंत्रित, विनियमित व परिरक्षित करण्यात येईल.

(२) नैसर्गिक आपत्तीमध्ये तसेच अपवादात्मक परिस्थितीमध्ये हस्तांतरीत केलेल्या कार्यक्षेत्रातील प्रकल्पांतर्गत बांधकामांच्या विशेष दुरुस्तीची कामे विहित केल्याप्रमाणे समुचित प्राधिकरणामार्फत केली जातील.

प्रकल्पस्तरावर पाण्याचे अंदाजपत्रक तयार करणे.

**६८.** (१) या संदर्भात यथोचित अधिकार प्रदान केलेल्या कालवा अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून पाण्याचे अंदाजपत्रक तयार करणे, म्हणजेच प्रकल्पासाठी प्रारंभिक सिंचन कार्यक्रम तयार करणे ही प्रकल्पस्तरीय संस्थेची जबाबदारी असेल. असा प्रारंभिक सिंचन कार्यक्रम राज्य शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या अग्रक्रमांवर आधारित असेल.

**स्पष्टीकरण.**—प्रकल्पस्तरीय संस्था अस्तित्वात नसेल तेव्हा, प्रारंभिक सिंचन कार्यक्रम तयार करण्याची जबाबदारी संबंधित कालवा अधिकाऱ्याची असेल.

(२) अनुज्ञेय हक्काच्या पाण्याचे प्रमाण, प्रत्येक वर्षी किंवा, यथास्थिति, प्रत्येक हंगामाला, व्यावहारिक परिस्थिती आणि राज्य शासनाने दिलेले निदेश यांचा विचार करून निश्चित करण्यात येईल.

राज्य शासन, कालवा व्यवस्थेचा कायदेशीर मालक असणे.

**६९.** व्यवस्थापनाच्या प्रयोजनासाठी पाणी वापर संस्थेकडे सुपूर्द केलेल्या कालवा व्यवस्थेची कायदेशीर मालकी राज्य शासनाकडे असेल आणि अशा व्यवस्थेचे नियंत्रण, व्यापक जनहितार्थ स्वतःकडे घेण्याचा त्याला अधिकार असेल.

बिगरसिंचन प्रयोजनांसाठी पाणीपुरवठा.

**७०.** समुचित प्राधिकरण, सर्व स्तरांवरील पाणी वापर संस्थांना, अनुज्ञेय पाण्याच्या प्रमाणाच्या हक्कांचे संरक्षण होईल व ते सुरक्षित ठेवता येईल अशा रीतीने, जलाशय, मुख्य कालवे, शाखा कालवे, वितरीका आणि नद्या यांमधून बिगरसिंचन प्रयोजनांसाठी करावयाचा पाणीपुरवठा विनियमित करील.

१९७६ चा महा. ३८. **७१.** महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ ची कलमे ८८ व ८९, योग्य त्या फेरफारांसह सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन या खालील क्षेत्रांमधून पाणी शुल्क वसूल करण्यासाठी लागू असतील. पाणी शुल्काची वसुली.

**७२.** हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापूर्वी, त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार, आराखडा निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्रात स्थापन झालेल्या कोणत्याही विद्यमान पाणी वापर संस्था या, अधिनियमाच्या तरतुदींन्वये स्थापन झाल्या असल्याचे मानण्यात येईल : विद्यमान पाणी वापर संस्थांना अधिनियम लागू असणे.

परंतु, अशा पाणी वापर संस्थांच्या कार्यक्षेत्राचा आराखडा या अधिनियमाच्या संबद्ध तरतुदींनुसार निश्चित करण्यात येईल आणि त्या प्रयोजनार्थ, विद्यमान करार, कोणताही असल्यास, तो फेरबदल केल्याप्रमाणे लागू होईल.

**७३.** (१) हा अधिनियम अंमलात आल्याचे दिनांकापासून बांधकामाधीन प्रकल्पास लागू होईल. बांधकामधीन प्रकल्पांबाबत विशेष तरतुदी.

(२) एक घनमीटर प्रतीसेकंदपेक्षा जास्त विसर्ग क्षमता नसलेल्या कार्यक्षेत्रात कलम ५, ६, ७ व ८ नुसार लघुवितरिकास्तरावरील पाणी वापर संस्था घटीत करूनच विहित केल्याप्रमाणे वितरणव्यवस्थेची कामे या पाणी वापर संस्थेच्या सहभागाने केली जातील व त्यांचे कार्यक्षेत्र हस्तांतरित केले जाईल. पाणी वापर संस्थेचा सहभाग बांधकामापासूनच असल्यामुळे या बांधकामाधीन प्रकल्पांवर घटीत होणाऱ्या पाणी वापर संस्थेला कलम २२ मधील दुरुस्ती व पुनरुज्जीवनबाबतच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

**७४.** (१) पाणी वापर संस्थेचा करार वगळता इतर सर्व परवानग्या, आदेश, निर्णय, सूचना आणि अन्य दस्तऐवज हे पाणी वापर संस्थेच्या अध्यक्षाकडून अथवा या संदर्भात पाणी वापर संस्थेने प्राधिकृत केलेल्या सचिवांकडून अधिप्रमाणित करण्यात येतील. पाणी वापर संस्थेच्या आदेशांचे व दस्तऐवजांचे अधिप्रमाणन.

(२) हा करार पाणी वापर संस्थेच्या अध्यक्षाकडून स्वाक्षरित करण्यात येईल.

**७५.** पाणी वापर संस्थेची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ अशा संस्थेमध्ये कोणतेही पद रिक्त राहिल्यामुळे किंवा तिच्या रचनेमध्ये कोणतीही त्रुटी राहिल्यामुळे अवैध होणार नाही. त्रुटी. रिक्त पद. इत्यादींमुळे कृती अवैध न होणे.

**७६.** (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. नियम.

(२) पहिल्यांदा करण्यात आलेले नियम वगळता, या अधिनियमाखाली करण्यात आलेले सर्व नियम, पूर्वप्रसिद्धिच्या शर्तींना अधीन राहून केलेले असतील.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्यात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, तर असा निर्णय **राजपत्रात**

अधिसूचित करण्यात येईल आणि अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून तो नियम केवळ अशा सुधारित स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, अंमलात येणार नाही. तथापि, अशी कोणतीही सुधारणा किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये त्यापूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधीग्राह्यतेस बाधा येणार नाही.

निरसन. **७७.** या अधिनियमाच्या प्रारंभास सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन असलेल्या क्षेत्रांच्या संबंधातील, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ च्या कलम ४६ ते ४८, कलम ५५, कलमे ५७ व ५८, कलम ६०, कलमे ६१ ते ७४ निरसित करण्यात आल्याचे मानण्यात येईल : १९७६ चा महा. ३८.

परंतु, अशा निरसनामुळे—

(एक) अशा प्रकारे निरसित झालेल्या कोणत्याही कलमाच्या पूर्वीच्या कार्यचालनाला किंवा त्याखाली यथोचितरित्या केलेल्या कोणत्याही गोष्टीला ; किंवा

(दोन) अशा प्रकारे निरसित झालेल्या कोणत्याही कलमाखाली प्राप्त केलेला, उपार्जित केलेला किंवा पत्करलेला कोणताही हक्क, विशेषाधिकार, आबंधन किंवा दायित्व यांना ; किंवा

(तीन) अशा प्रकारे निरसित झालेल्या कोणत्याही कलमाखाली केलेल्या कोणत्याही अपराधासाठी देण्यात आलेली शास्ती, जप्ती किंवा शिक्षा यांना ; किंवा

(चार) उपरोक्तप्रमाणे, कोणताही हक्क, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा यांच्या संबंधातील कोणतेही अन्वेषण, कार्यवाही, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना यांना,—

—बाधा पोहचणार नाही आणि असे कोणतेही अन्वेषण, कार्यवाही, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करण्यात येईल, चालू ठेवण्यात येईल किंवा अंमलात आणण्यात येईल आणि हा अधिनियम अंमलात आला नव्हता अशा रीतीने अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा लादण्यात येईल :

परंतु आणखी असे की, मागील परंतुकाच्या अधीन राहून, केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही (अशा प्रकारे निरसित झालेल्या कोणत्याही कलमाखालील निर्माण झालेले कोणतेही आकार करण्यात किंवा काढण्यात आलेल्या नेमणुका नियम, अधिसूचना, आदेश, समन्स, नोटिशी वॉरंट आणि घोषणा, प्रदान करण्यात आलेले किंवा निहित असलेले प्राधिकार व अधिकार, तयार करण्यात आलेले किंवा सुधारित करण्यात आलेले हक्कांचे अभिलेख, कालवे किंवा बांधण्यात आलेली कोणतीही पाण्यासाठी केलेली कामे वा पाण्याचे प्रवाह किंवा शेतीतील पाट, करण्यात आलेला कोणताही पाणीपुरवठा, आकारण्यात आलेले पाण्याचे दर, करण्यात आलेले करार किंवा संविदा, बसविण्यात आलेले कोणतेही कर किंवा फी, देण्यात आलेली कोणतीही नुकसानभरपाई, कालव्याच्या तातडीच्या बांधकामाकरिता मिळविण्यात आलेले किंवा पुरविण्यात आलेले कोणतेही कामगार, संपादित करण्यात आलेले कोणतेही हक्क किंवा पत्करलेली कोणतीही दायित्वे, दाखल करण्यात आलेले कोणतेही दावे किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही किंवा करण्यात आलेले कोणतेही अपील यांसह), जोवर, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तोपर्यंत या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये, करण्यात आलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल ;

आणि जोपर्यंत ती या अधिनियमाखालील करण्यात आलेल्या गोष्टीद्वारे किंवा कार्यवाहीद्वारे निष्प्रभावित करण्यात येत नाही तोपर्यंत तदनुसार अंमलात असण्याचे चालू राहील.

१९७६ चा महा. ३८. **७८.** या अधिनियमाद्वारे विनिर्दिष्टपणे निरसित न केलेल्या महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ च्या तरतुदी अंमलात राहतील आणि योग्य त्या फेरफारांसह, सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन याखालील क्षेत्रांना लागू होतील. व्यावृत्ती.

**७९.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदी, सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन या खालील क्षेत्रांच्या संबंधात अधिभावी असतील. अधिनियम अधिभावी असणे.

**८०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना किंवा हा अधिनियम अंमलात आल्यानंतर कोणत्याही पाणी वापर संस्थेची प्रथम स्थापना किंवा पुनर्स्थापना करताना कोणतीही अडचण उद्भवली तर, समुचित प्राधिकरणाला, **राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे, प्रसंगानुसार अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ती कृती करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेले सर्व आदेश, ते काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येतील.

२००४ चा महा. अध्या. २३. **८१.** महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अध्यादेश, २००४, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २३ याचे निरसन.